cmyk

## संपादकीय

### पाण्याचा सातबारा: जलसुरक्षेकडे वाटचाल करणारे ऐतिहासिक पाऊल

''पाणी हेच जीवन'' ही उक्ती आपण अनेक वर्षांपासून ऐकत आलो आहोत. शालेय पाठ्यपुस्तकांपासून ते सरकारी जाहिरातींपर्यंत सर्वत्र या वाक्याचा वापर होत असतो. मात्र, प्रत्यक्ष कृतीच्या पातळीवर पाहिले तर पाण्याबाबतची आपली वागणूक या घोषवाक्याच्या पूर्णपणे विरुद्ध असल्याचे दिसून येते. पाणी ही अमर्याद उपलब्ध असलेली नैसर्गिक संपत्ती असल्याचा गैरसमज समाजात खोलवर रुजलेला आहे.

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–७२ | सोमवार दि.०१ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### राहुल गांधी यांचा १२ वीच्या विद्यार्थ्यांशी संवाद

नवी दिल्ली: लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सीबीएसईच्या १२ वीच्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यांनी रविवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर विद्यार्थ्यांसोबतच्या संवादाचा व्हीडीओ पोस्ट केला आणि सीबीएसईच्या ऑन-स्क्रीन मार्किंग प्रक्रियेतील गोंधळाच्या आरोपांवरून केंद्रावर निशाणा साधला. राहुल गांधींनी ज्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यात वेदांतचाही समावेश होता. वेदांतचा आरोप आहे की, पुनर्मूल्यांकनादरम्यान पोर्टलवर अपलोड केलेल्या स्कॅन केलेल्या प्रती त्याच्या नव्हत्या. त्याची एक सोशल मीडिया पोस्ट व्हायरल झाल्यानंतर इतर अनेक विद्यार्थीही अशाच तक्रारी घेऊन पुढे आले होते. वेदांत आणि त्याच्या मित्रांनी सीबीएसई आणि मोदी सरकारला फक्त काही सोपे प्रश्न विचारले होते, पण उत्तर देण्याऐवजी त्यांचा अपमान करण्यात आला.

### नेपाळच्या पंतप्रधानांकडून पुन्हा कुरापत

काठमांडू : नेपाळचे पंतप्रधान बालेन्द्र शाह यांच्या सरकारने लिपुलेख, कालापाणी आणि लिम्पियाधुरा या क्षेत्रांवरून मागे निर्माण झालेला सीमावाद पुन्हा उकरून काढला आहे. भारतासोबत सुरु असणारा लिपुलेख खिंडीबाबतचा वाद हा चर्चा आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून सोडवला जाईल. यामध्ये ब्रिटन आणि चीनला देखील सामील करून घेणार आहे, अशी माहिती पंतप्रधान शाह यांनी रविवारी (दि.३१ मे) दिली. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर ते प्रथमच नेपाळच्या संसदेला संबोधित करत होते. काठमांडू पोस्टने दिलेल्या वृत्तानुसार, शाह म्हणाले, ''आम्ही केवळ भारत आणि चीनशीच नाही, तर ब्रिटन सरकारशीही बोललो आहोत.

### इस्त्रायलमधील ९०० वर्ष जुन्या किल्ल्यावर ताबा

तेहरान: या तसनीम वृत्तसंस्थेनुसार, इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) दावा केला आहे की त्यांच्या हवाई संरक्षण युनिटने रविवारी इराणी हवाई हद्दीत घुसलेला एक अमेरिकन एमक्यू-१ ड्रोन पाडला. आयआरजीसीच्या म्हणण्यानुसार, हवाई संरक्षण आणि निगराणी प्रणालींनी ड्रोनला तात्काळ ओळखले. त्यानंतर अत्याधुनिक क्षेपणास्त्र प्रणालींद्वारे त्याला लक्ष्य करून पाडण्यात आले. इराणने दावा केला आहे की, हा ड्रोन अमेरिकी लष्कराचा होता आणि शत्रुत्वपूर्ण कारवाई करण्याच्या उद्देशाने तो हद्दीत घुसला होता.

### केदारनाथ यात्रा थांबवली

देहराडून: हिंदूंमध्ये चारधाम यात्रेला अनण्यसाधारण महत्व आहे. यंदाच्या वर्षी अक्षय तृतीयेला यात्रेला सुरूवात झाली होती. त्यामुळे भाविकांमध्ये मोठे आनंदाचे वातावरण होते. मात्र येथील बदलत्या नैसर्गिक परिस्थितीमुळे याचा यात्रेवर परिणाम होत असतो. हवामान विभागाने पुढील काही तासांत मुसळधार पाऊस, जोरदार वारे आणि वादळाची शक्यता व्यक्त केली आहे. संभाव्य धोका लक्षात घेऊन केदारनाथ धामाकडे जाणाऱ्या भाविकांना विविध टप्प्यांवर आणि होल्डिंग क्षेत्रांमध्ये थांबवून सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले आहे. उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि हवामान विभागाने जारी केलेल्या ऑरेंज अलर्टच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून केदारनाथ यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**
**बीड, दि.३० मे २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४९.५० क्विंटल | १,८४७ | २,४७० | २,३०१ |
| ज्वारी/हायब्रिड: ११९.०० क्विंटल | १,८८८ | ४,१७७ | २,८४२ |
| मका/लोकल: ८.५० क्विंटल | १,७०० | १,९७० | १,८३५ |
| तूर : १०.५० क्विंटल | -- | -- | -- |
| उडीद : -- क्विंटल | -- | -- | -- |
| बाजरी: १४२.५० क्विंटल | २,००० | २,५१३ | २,३११ |
| मुग: -- क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:१०.५० क्विंटल | ६,२०० | ७,०५० | ६,६२५ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,६८० | ५,७९० | ५,७३५ |

# १० दिवसांत शेतकरी कर्जमाफी; कृषीमंत्री भरणे यांची भाषणा

## दोन लाखांपर्यंत कर्जमाफी, नियमित कर्जदारांना ५० हजारांचे अनुदान

अहिल्यानगर । प्रतिनिधी

**कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्यातील शेतकरी कर्जमाफीबाबत गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या चर्चेला आता प्रत्यक्षात मूर्त स्वरूप येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी येत्या आठ ते दहा दिवसांत शेतकरी कर्जमाफीची घोषणा अमलात आणली जाईल, अशी ग्वाही दिल्याने राज्यभरातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत.**



अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना कृषिमंत्री भरणे यांनी ही महत्त्वपूर्ण घोषणा केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आपल्या भाषणात भरणे यांनी व्यासपीठावरील मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची परवानगी घेऊन ही घोषणा करत असल्याचे स्पष्ट केले. राज्य सरकारच्या प्रस्तावित योजनेनुसार बँकांचे कर्ज थकलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जाची संपूर्ण माफी दिली जाणार आहे. सलग नापिकी, हवामानातील बदल, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारातील अस्थिरता यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. विशेष म्हणजे केवळ थकीत कर्जदारांनाच नव्हे तर बँकांचे कर्ज नियमितपणे फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही या योजनेत लाभ दिला जाणार आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान जमा केले जाणार असल्याची माहिती कृषिमंत्र्यांनी दिली. राज्य सरकार ही कर्जमाफी योजना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ▶▶ पान २ वर

### निर्णयाकडे लाखो शेतकऱ्यांच्या नजरा

राज्यातील शेतकरी संघटना आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, कर्जमाफीचा निर्णय प्रत्यक्षात लागू झाल्यास लाखो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळू शकतो. मात्र, पात्रता निकष, लाभार्थ्यांची संख्या, निधीची तरतूद आणि अंमलबजावणीची प्रक्रिया याबाबत सरकारकडून अधिकृत शासन निर्णय (जीआर) जारी होणे आवश्यक आहे. त्यामुळे आता येत्या काही दिवसांत राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या योजनेवर अंतिम शिक्कामोर्तब होते का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# महायुतीचा जागावाटपाच तिढा अखेर सुटला

## भाजप ११, शिवसेना ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागा लढवणार

मुंबई । प्रतिनिधी

**स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमधील विधान परिषद निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर महायुतीतील जागावाटपावरून सुरू असलेला तिढा अखेर सुटला आहे. राज्य आणि केंद्रातील वरिष्ठ नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर १७ जागांसाठीचा अंतिम फॉर्म्युला निश्चित करण्यात आला असून, त्यानुसार भाजप ११, शिवसेना ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागांवर निवडणूक लढवणार आहे.**



अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने या मतदारसंघातील विधान परिषदेच्या जागा रिक्त होत्या. गेल्या दोन-अडीच वर्षांपासून अनेक जागांवर प्रतिनिधित्व नसल्याने या निवडणुकांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. निवडणुकीची घोषणा होताच महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाच्या चर्चांना वेग आला होता. महायुतीत सर्वाधिक चर्चा शिवसेनेच्या दाव्यांवर झाली. शिवसेनेने आपली ताकद असलेल्या सहा पारंपरिक जागांवर दावा केला होता. मात्र अंतिम चर्चेनंतर त्यापैकी चार जागांवरच शिवसेनेला समाधान मानावे लागले. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघावर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांनी दावा केला होता. अखेर रायगडच्या पालकमंत्रीपदासह विधान परिषदेची जागा राष्ट्रवादीला देण्याच्या सूत्रावर तोडगा काढण्यात आल्याची माहिती ▶▶ पान २ वर

## राज्यातील कायदा-सुव्यवस्था ढासळली; काँग्रेसची टीका

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्था रसातळाला गेली असून, मंत्रालयापर्यंत हप्ते पोहोचवले जात आहेत.



राज्यात ड्रग्जचा खुलेआम काळाधंदा सुरू आहे, गांजा विकला जातो, हातभट्ट्या व विषारी दारूने थैमान घातले आहे. या अवैध धंद्यातूनच पुण्यात विषारी दारूने २२ निष्पाप लोकांचे बळी घेतले आहेत. राज्यातील कायदा व सुव्यवस्था ढासळल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

पुण्यातील प्रकरणाने सर्व स्तरांतून संताप व्यक्त केला जात असल्याने स्वतःची अब्रू वाचवण्यासाठी आता कारवाईचे नाटक केले जात असल्याचे सपकाळ म्हणाले. मराठा आंदोलनावेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईतील वाशी येथे मध्यरात्री मनोज जरांगे यांना आरक्षण दिल्याचे जाहीर केले व गुलाल उधळला होता, त्यानंतर आझाद मैदानातील आंदोलनावेळीही गुलाल उधळला, यावेळी मुख्यमंत्री ▶▶ पान २ वर

# जरांगे पाटलांचे उपोषण मध्यरात्री मागे

जालना । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवली सराटी येथे पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसणारे मनोज जरांगे पाटील यांनी अखेर मध्यरात्री आपले उपोषण मागे घेतले. राज्य सरकारच्या शिष्टमंडळासोबत प्रदीर्घ चाललेल्या सकारात्मक चर्चेनंतर जरांगे यांनी हा निर्णय जाहीर केला.



गेल्या दोन दिवसांपासून कडक उन्हात, कोणत्याही मंडपाची सुविधा नसताना मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले होते. सततच्या उन्हामुळे त्यांची प्रकृती कमालीची खालावली होती. शिष्टमंडळ भेटीला येण्यापूर्वीच त्यांना उलट्यांचा त्रास सुरू झाल्याने आंदोलनस्थळी उपस्थित मराठा बांधवांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.बैठकीचे नाट्य: मसुदा नाकारल्यापासून तोडग्यापर्यंत सरकारने यापूर्वी पाठवलेला मसुदा सुरुवातीला जरांगे पाटील यांनी अमान्य केला होता आणि ▶▶ पान २ वर

# अहिल्यादेवीचा जीवनपट माझ्यासाठी आदर्श दीपस्तंभासारखा-सुनेत्रा पवार

## अहिल्यादेवी होळकर यांच्या चौंडी येथील जयंती उत्सवाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही उपस्थिती

अहिल्यानगर । प्रतिनिधी

स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले इत्यादींच्या पुरोगामी विचारांच्या वारशामुळेच हे शक्य झाले असे सांगतानाच आदरणीय अजितदादांच्या पश्चात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट माझ्यासाठी आदर्श दीपस्तंभासारखा कार्य करत



आहे, अशा भावना राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी रविवारी चौंडी येथे व्यक्त केल्या.

अखंड भारताच्या कल्याणाचा ध्यास घेणाऱ्या, न्याय, त्याग आणि कर्तृत्वाचे प्रतीक असणाऱ्या, पुण्यश्लोक, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या चरणी सुनेत्रा अजित पवार या नतमस्तक झाल्या. पुण्यश्लोक, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने श्री क्षेत्र चौंडी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार या उपस्थित राहिल्या. सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, अहिल्यादेवी होळकर यांनी २८ वर्षे राज्यकारभार केला. त्यांनी केवळ ▶▶ पान २ वर

# खिंडकर, देशमुख यांच्या फिर्यादी खोट्या; आता दोघांवरही गुन्हे दाखल होण्याची शक्यता

बीड । प्रतिनिधी

परस्परविरोधी गंभीर गुन्हे दाखल करून पोलीस यंत्रणेचा गैरवापर करणाऱ्या दोन्ही बाजूंच्या फिर्यादींचा खोटेपणा बीड ग्रामीण पोलिसांनी उघडकीस आणला आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या जबाबांनंतर दोन्ही बाजूंची भांडणे आणि पिस्तूल दाखवून जीवे मारण्याची धमकी



देण्याची घटना घडलीच नसल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. खोटी तक्रार देऊन कायदेशीर यंत्रणेची दिशाभूल केल्याप्रकरणी आता या दोन्ही तक्रारदारांवरच कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३० मे २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास एक घटना घडल्याचा दावा करत दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुद्ध गुन्हे दाखल केले ▶▶ पान २ वर

# राज्यात मान्सूनचे आगमन लांबणार

## शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये; हवामान खात्याकडून पावसाची नवी तारीख

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील हवामानात सध्या मोठ्या प्रमाणावर बदल होण्यास सुरुवात झाली आहे. मे महिन्यातील कडक उन्हाच्या झळांनंतर आता १ जून पासून सुरू होणाऱ्या नवीन आठवड्यात हवामानाचा नूर




अधिकच बदलणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, राज्यातील अनेक भागांमध्ये वादळी पावसाची दाट शक्यता आहे. मात्र, हा पाऊस मान्सूनचा ▶▶ पान २ वर

# देव मंत्र्यांची वाट पाहत नाही, सर्व जण समान आहेत
# हायकोर्टाने ओढले मंदिरांमधील व्हिआयपी दर्शनावर ताशेरे

चेन्नई । वृत्तसंस्था

मंत्री आणि आमदारांनी असा विचार करू नये की ते कधीही मंदिरात जाऊ शकतात आणि देव त्यांची वाट पाहत असतील. आपल्याला व्हीआयपी दर्शनाची गरजच काय? देवाच्या दरबारात सर्वजण समान आहेत,'' अशा शब्दांमध्ये मंदिरांमधील व्हीआयपी दर्शनावर मद्रास उच्च न्यायालयाने तोशेरे ओढले. चर्च आणि मशिदींमध्ये अशी कोणतीही प्रथा पाळली जात




नाही. हिंदू मंदिरांमध्ये सशुल्क (पैसे देऊन) व्हीआयपी दर्शन घेणे चुकीचे आणि भेदभाव करणारे आहे, अशी टिप्पणीही न्यायमूर्ती जी.आर. स्वामीनाथन आणि न्यायमूर्ती व्ही. लक्ष्मीनारायणन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने केली.

वृत्तानुसार, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि घटनात्मक पदांवरील व्यक्तींना वगळून मंदिरांमधील 'व्हीआयपी दर्शन' आणि 'विशेष दर्शन' प्रथा पूर्णपणे बंद करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी पी. चोकलिंगम यांच्या वतीने दाखल करण्यात आली होती. यावर न्यायमूर्ती जी.आर. स्वामीनाथन आणि न्यायमूर्ती व्ही. लक्ष्मीनारायणन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर सुनावणी झाली. वकील बी. जगन्नाथ यांनी सांगितले की, 'बांके बिहारी मंदिर' प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने विशेष दर्शन आणि व्हीआयपी व्यवस्था बंद करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्याचे आदेश दिले होते. या संदर्भातील अहवाल समितीने गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयात सादर केला आहे. मंत्री आणि आमदारांनी असा ▶▶ पान २ वर

# मराठा आंदोलकाचा अपघाती मृत्यू

बीड । प्रतिनिधी

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषण पुकारले होते. मात्र, शनिवारी मध्यरात्री मनोज जरांगे यांच्या मागण्या सरकारने पूर्ण केल्यानंतर उपोषणाला स्थगिती दिली. त्यानंतर आंदोलन संपवून अंतरवाली सराटी येथून इंदापूरकडे परत जात असताना धुळे – सोलापूर महामार्गावरील मांजरसुबा येथे उभ्या ट्रॅकवर धडकून एका आंदोलकाचा अपघातामध्ये दुर्दैवी मृत्यू झाला.**

मराठा आंदोलक आंदोलन संपल्यानंतर घरी परतत असताना बीड येथे त्यांचा अपघात झाला. परतीच्या प्रवासादरम्यान आंदोलकांच्या चारचाकी वाहनाने एका उभ्या ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पाण्याचा सातबारा : जलसुरक्षेकडे वाटचाल करणारे ऐतिहासिक पाऊल

''पाणी हेच जीवन'' ही उक्ती आपण अनेक वर्षांपासून ऐकत आलो आहोत. शालेय पाठ्यपुस्तकांपासून ते सरकारी जाहिरातींपर्यंत सर्वत्र या वाक्याचा वापर होत असतो. मात्र, प्रत्यक्ष कृतीच्या पातळीवर पाहिले तर पाण्याबाबतची आपली वागणूक या घोषवाक्याच्या पूर्णपणे विरुद्ध असल्याचे दिसून येते. पाणी ही अमर्याद उपलब्ध असलेली नैसर्गिक संपत्ती असल्याचा गैरसमज समाजात खोलवर रुजलेला आहे. त्यामुळे पावसाचे पाणी साठवणे, भूजल पुनर्भरण करणे, वापराचे नियोजन करणे किंवा पाण्याच्या अपव्ययावर नियंत्रण ठेवणे या बाबींना आवश्यक ते महत्त्व दिले जात नाही. परिणामी, दरवर्षी पावसाळ्यात अब्जावधी लिटर पाणी वाहून जाते आणि उन्हाळा सुरू होताच टँकर, दुष्काळ, कोरडी विहिरी आणि पाणीटंचाईच्या बातम्या पुन्हा चर्चेत येतात. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यालाही आज पाण्याच्या प्रश्नाने ग्रासले आहे. एका बाजूला काही भागांमध्ये अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होते, तर दुसऱ्या बाजूला मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गावे उन्हाळ्यात तीव्र जलटंचाईचा सामना करतात. हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप अधिक अनिश्चित झाले आहे. पावसाचे दिवस कमी होत आहेत, परंतु अल्प कालावधीत अतिवृष्टी होत आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि शास्त्रीय व्यवस्थापन ही काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने देशात प्रथमच ''पाण्याचा सातबारा'' तयार करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टी दाखवणारा ठरतो. जमीन मालकीचा सातबारा जसा एखाद्या शेतजमिनीची संपूर्ण माहिती देतो, त्याचप्रमाणे जलसातबारा एखाद्या गावातील किंवा परिसरातील पाण्याची उपलब्धता, वापर, पुनर्वापर आणि शिल्लक यांचा संपूर्ण हिशोब ठेवणार आहे. ही संकल्पना केवळ प्रशासनिक उपक्रम नसून जलव्यवस्थापनाच्या क्षेत्रातील एका नव्या युगाची सुरुवात आहे. आजवर पाण्याबाबतची सर्वात मोठी समस्या म्हणजे त्याचा अचूक हिशोब नसणे. किती पाणी उपलब्ध आहे, किती वापरले जाते, किती वाया जाते आणि किती जमिनीत मुरते याबाबत ठोस माहिती नसल्यामुळे धोरणेही अनेकदा अंदाजांवर आधारित राहतात. ''जे मोजता येते तेच नियंत्रित करता येते'' हा व्यवस्थापनाचा मूलभूत सिद्धांत आहे. पाण्याच्या बाबतीतही हे तितकेच लागू पडते. म्हणूनच जलसातबारा ही संकल्पना महत्त्वाची आहे. ती पाण्याला केवळ नैसर्गिक संसाधन न मानता जबाबदारीने वापरायची संपत्ती म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करते.

या योजनेची वैज्ञानिक बाजू विशेष उल्लेखनीय आहे. आयआयटी बॉम्बेचे जल अभ्यासक डॉ. अविनाश कदम, अक्वेरियम संस्थेचे प्रमुख डॉ. सुब्रमण्यम कंसूर आणि जलतज्ज्ञ उदय नायर यांच्या समितीने विकसित केलेले 'वॉटर अकाउंटिंग फ्रेमवर्क' आणि 'वॉटर बॅलन्स शीट' हे या उपक्रमाचे भक्कम आधारस्तंभ आहेत. उपग्रह तंत्रज्ञान, डिजिटल नकाशे, स्मार्ट सेन्सर्स आणि आधुनिक माहिती प्रणाली यांच्या मदतीने प्रत्येक गावातील जलस्रोतांची माहिती संकलित केली जाणार आहे. यामुळे पाण्याचा प्रवास, त्याचा वापर आणि त्यातील नुकसान यांचे अचूक विश्लेषण शक्य होणार आहे. या योजनेतील आणखी एक नावीन्यपूर्ण संकल्पना म्हणजे 'अक्वा क्रेडिट्स'. पर्यावरण संरक्षणासाठी जगभरात कार्बन क्रेडिट्सची संकल्पना यशस्वी ठरली आहे. त्याच धर्तीवर पाणी वाचवणाऱ्या ग्रामपंचायती, संस्था आणि व्यक्तींना आर्थिक प्रोत्साहन देण्याचा विचार अत्यंत सकारात्मक आहे. आजपर्यंत पाणी वाचवण्याचे आवाहन केवळ नैतिकतेच्या आधारावर केले जात होते. मात्र, जेव्हा पाणी बचतीला आर्थिक मूल्य प्राप्त होईल, तेव्हा समाजाचा सहभाग अधिक वाढण्याची शक्यता आहे. पाण्याचे संवर्धन हे केवळ सामाजिक कर्तव्य न राहता आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरेल.

महाराष्ट्रासाठी ही कल्पना पूर्णपणे नवी नाही. सुमारे दोन दशकांपूर्वी नाशिक जिल्ह्यात मोहाडी आणि ओझर परिसरात पाणीवापर सहकारी संस्थांच्या माध्यमातून यशस्वी प्रयोग झाले होते. भरत कावळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी वाघाड धरणाच्या पाण्याचे शास्त्रीय व्यवस्थापन करून ''मोजून पाणी, मोजून पैसे'' ही संकल्पना राबवली होती. त्या प्रयोगाचे जागतिक बँकेनेही कौतुक केले होते. लोकसहभाग, पारदर्शकता आणि जबाबदारी या तत्त्वांवर आधारित असलेली ही चळवळ ग्रामीण जलव्यवस्थापनाचा आदर्श ठरली होती. जलसातबारा ही संकल्पना त्या अनुभवांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारी आहे. मात्र, जलसातबारा यशस्वी करण्यासाठी केवळ ग्रामीण भागावर लक्ष केंद्रित करून चालणार नाही. शहरी भागातील पाण्याचा अपव्यय ही देखील तितकीच गंभीर समस्या आहे. मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे आणि इतर महानगरांमध्ये दररोज कोट्यवधी लिटर पाणी केवळ गळतीमुळे वाया जाते. जुनाट पाइपलाइन, अनधिकृत जोडण्या, अपूर्ण देखभाल आणि नियोजनाचा अभाव यामुळे मोठ्या प्रमाणावर जलनुकसान होते. अनेक अभ्यासांनुसार, काही शहरांमध्ये एकूण पुरवठ्याच्या ३० ते ४० टक्के पाणी ग्राहकांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच नष्ट होते. ही परिस्थिती बदलल्याशिवाय जलसुरक्षेचे उद्दिष्ट साध्य होणार नाही. शहरी भागात स्मार्ट मीटरिंग, डिजिटल लीक डिटेक्शन प्रणाली, जलवाहिन्यांचे नियमित ऑडिट आणि सांडपाण्याचा पुनर्वापर यासारख्या उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज आहे. जलवाहिन्या आणि ड्रेनेज लाईन्स स्वतंत्र रंगांमध्ये ठेवणे, भूगर्भातील पाणीवाहिन्यांचे डिजिटल मॅपिंग करणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने गळती शोधणे यासारखे उपाय आता पर्याय नसून आवश्यकता बनले आहेत. कारण भविष्यातील जलसंकट केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित राहणार नाही; ते शहरांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासालाही मोठा फटका देऊ शकते. देशातील वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि हवामान बदल यांचा एकत्रित परिणाम जलस्रोतांवर होत आहे. संयुक्त राष्ट्रांसह अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांनी भविष्यातील संघर्षांचे एक मोठे कारण पाणी असू शकते, असा इशारा दिला आहे. त्यामुळे पाण्याचे व्यवस्थापन ही केवळ विकासाची बाब नसून राष्ट्रीय सुरक्षेचाही विषय बनत चालला आहे. अशा वेळी महाराष्ट्राने जलसातबाऱ्यासारखा उपक्रम हाती घेणे ही दूरदृष्टीची बाब आहे. तथापि, कोणतीही योजना केवळ सरकारी आदेशांनी यशस्वी होत नाही. तिच्यासाठी लोकसहभाग, जनजागृती आणि सामाजिक बांधिलकी आवश्यक असते. प्रत्येक गावाने पाण्याचे बजेट तयार करणे, प्रत्येक घराने पावसाचे पाणी साठवणे, प्रत्येक शेतकऱ्याने सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करणे आणि प्रत्येक नागरिकाने पाण्याचा अपव्यय टाळणे ही तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. शासन धोरण आखू शकते, निधी देऊ शकते आणि तंत्रज्ञान उपलब्ध करून देऊ शकते; परंतु पाणी वाचवण्याची संस्कृती समाजानेच निर्माण करावी लागेल. पाण्याचा सातबारा हा केवळ एक प्रशासकीय दस्तऐवज नाही; तो महाराष्ट्राच्या जलभविष्याचा आराखडा आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब मोजण्याची, जपण्याची आणि योग्य ठिकाणी वापरण्याची संस्कृती निर्माण करण्याची ही संधी आहे. जर हा उपक्रम प्रभावीपणे राबविला गेला, तर महाराष्ट्राला दुष्काळमुक्त, जलसमृद्ध आणि शाश्वत विकासाच्या दिशेने नेणारा तो मैलाचा दगड ठरू शकतो. आज गरज आहे ती केवळ पाण्याचा हिशोब ठेवण्याची नाही, तर पाण्याबाबतची आपली मानसिकता बदलण्याची. पाणी ही सरकारी मालमत्ता किंवा निसर्गाची मोफत देणगी नसून पुढील पिढ्यांकडून घेतलेले कर्ज आहे, ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. जलसातबारा त्या जाणीवेला संस्थात्मक रूप देण्याचा प्रयत्न आहे. हा प्रयत्न यशस्वी झाला, तर महाराष्ट्र जलव्यवस्थापनाचा नवा आदर्श निर्माण करेल आणि भावी पिढ्यांसाठी समृद्ध जलसंस्कृतीचा भक्कम पाया घालेल.

# शुक्रवारी मागणी , रविवारी स्थळ पाहणी ; बेलेश्वर वस्तीच्या शेतरस्त्याला बीडच्या तहसील प्रशासनाकडून तातडीची दखल

**बीड । प्रतिनिधी**

**शासनाच्या कामकाजाविषयी अनेकदा तक्रारी आणि विलंबाची भावना व्यक्त केली जाते . मात्र एखादी मागणी प्रत्यक्षात ऐकून घेऊन तातडीने कृती केली तर प्रशासनाविषयी लोकांचा विश्वास किती दृढ होतो , याचे उदाहरण बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील मुळूकवाडी ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या बेलेश्वर वस्तीमध्ये पाहायला मिळाले . शुक्रवारी वस्तीवरील नागरिकांनी शेतरस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली आणि त्यानंतर प्रशासनाने विलंब न लावता रविवारी सुट्टीचा दिवस असतानाही प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून प्रश्न सोडविण्याच्या दिशेने पाऊल उचलले . या कृतीमुळे वस्तीवरील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाविषयी विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त होत आहे .**

बेलेश्वर वस्ती ही सुमारे दोनशे लोकसंख्या असलेली वस्ती असून येथील नागरिकांचे दैनंदिन जीवन शेती , जनावरे , बाजारपेठ , शाळा , आरोग्य सेवा आणि गावाशी जोडलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे . अनेक वर्षांपासून वापरात असलेला हा मार्ग काही कारणांमुळे अडथळाग्रस्त झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगण्यात आले . विशेषतः शेतमालाची वाहतूक , खते आणि बियाणे नेणे , शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास , आजारी व्यक्तींना उपचारासाठी नेणे आणि दैनंदिन ये – जा यात अडथळे निर्माण होत असल्याचे महिलांनी प्रशासनासमोर मांडले. या प्रश्नाची तीव्रता वाढल्याने वस्तीवरील महिलांनी लहान मुलांना सोबत घेऊन थेट तहसील कार्यालय गाठले . नागरिकांनी केवळ निवेदन न देता प्रत्यक्ष परिस्थिती मांडत हा रस्ता खुला करण्याची मागणी केली . या वेळी नागरिकांच्या भावना आणि प्रश्न गांभीर्याने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी ऐकून घेतला . विशेष म्हणजे हा प्रश्न केवळ महसुली न राहता सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला. बीड जिल्ह्यात प्रशासनाने गेल्या काही काळात शेतकरी आणि ग्रामीण भागातील प्रश्नांवर संवेदनशील भूमिका घेतल्याचे अनेक उदाहरणांमधून दिसून आले आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर नेहमीच तातडीची दखल घेण्याची भूमिका स्वीकारली असल्याची भावना ग्रामीण भागात दिसून येते . शेतकरी आणि सामान्य नागरिकांच्या अडचणी कमी



व्हाव्यात यासाठी प्रत्यक्ष पाहणी आणि निर्णय प्रक्रियेला गती देण्यावर त्यांचा भर राहिला . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक हे देखील महसूल विषयक प्रकरणे वेळेत निकाली निघावीत आणि नागरिकांना वारंवार कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागू नयेत यासाठी सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे दिसून येते . ग्रामीण भागातील प्रश्न केवळ कागदांवर न राहता प्रत्यक्ष जमिनीवर सोडविण्याची भूमिका प्रशासनाने घेतल्याचे अनेकांनी नमूद केले . उपविभागीय अधिकारी कविता जाधव या देखील रस्ते , प्रवेशमार्ग आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित विषयांमध्ये तातडीने निर्णय व्हावेत यासाठी आग्रही असल्याचे स्थानिक स्तरावर बोलले जाते . महसूल प्रशासनाच्या विविध स्तरांवर समन्वयातून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न होत असल्याचे या प्रकरणातून दिसून आले. या पार्श्वभूमीवर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी विषयाची गंभीर दखल घेतली . रविवार हा सुट्टीचा दिवस असूनही नागरिकांचा प्रश्न प्रलंबित ठेवण्याऐवजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्याचा निर्णय घेण्यात आला . प्रशासनाचा निर्णय हा केवळ औपचारिक न राहता प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन वस्तुस्थिती समजून घेण्याचा होता . त्यानुसार महसूल विभागाचे पथक या ठिकाणी दाखल झाले . या पाहणीमध्ये कर्तव्यदक्ष मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी प्रत्यक्ष वस्ती गाठून नागरिकांशी संवाद साधला . उन्हाच्या तीव्रतेकडे दुर्लक्ष करून त्यांनी वस्तीतील महिला , शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांकडून माहिती घेतली . रस्ता नेमका कुठे अडतो , कोणत्या कारणांमुळे वापरात अडथळा येतो , नागरिकांना किती अंतर वळसा घालावा लागतो , विद्यार्थ्यांवर आणि शेतकऱ्यांवर त्याचा काय परिणाम होतो , याची तपशीलवार माहिती संकलित केली . स्थळ पाहणी दरम्यान अनेक महिलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या . मुलांना शाळेत पाठविताना होणारा त्रास , आजारी व्यक्तींना वाहन मिळण्यात येणाऱ्या अडचणी आणि शेतीसाठी लागणाऱ्या साहित्याच्या वाहतुकीतील अडथळे याबाबत नागरिकांनी प्रशासनाला माहिती दिली . काही नागरिकांनी सांगितले की पावसाळा सुरू झाल्यानंतर परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी प्रत्येक बाजू समजून घेत प्रत्यक्ष नोंदी घेतल्या . जागेचे स्वरूप , उपलब्ध मार्ग , स्थानिक परिस्थिती आणि नागरिकांच्या मागण्या यांचा अभ्यास करण्यात आला . पाहणीदरम्यान उपस्थित ग्रामस्थांना केवळ आश्वासन न देता पुढील कार्यवाही प्रक्रियेबाबत माहिती देण्यात आली . या भेटीमुळे वस्तीवरील नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले . अनेकांनी प्रशासन पहिल्यांदाच इतक्या तत्परतेने प्रतिसाद देत असल्याची भावना व्यक्त केली . महिलांनी विशेषतः सुट्टीच्या दिवशी अधिकारी स्वतः येऊन समस्या ऐकत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातील प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत असल्याचे या घटनेतून दिसते . पूर्वी नागरिकांना कार्यालयात जावे लागायचे आणि नंतर निर्णयाची वाट पाहावी लागायची . मात्र आता प्रशासन प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन समस्या समजून घेत असल्याने लोकांचा सहभाग आणि विश्वास दोन्ही वाढताना दिसत आहेत . रस्ते हे केवळ वाहतुकीचे साधन नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे जीवनवाहिनी आहेत . शेतकऱ्यांसाठी रस्ता म्हणजे शेतीचा श्वास , विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा मार्ग आणि महिलांसाठी सुरक्षित दैनंदिन जीवनाचा आधार असतो . त्यामुळे अशा प्रश्नांची तातडीने दखल घेणे ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून लोकाभिमुख प्रशासनाची ओळख ठरते . बेलेश्वर वस्तीच्या या प्रकरणातून एक संदेश स्पष्ट झाला आहे की नागरिकांनी संघटितपणे मांडलेली मागणी आणि प्रशासनाची सकारात्मक भूमिका यांचा मेळ घातला तर अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात . प्रत्यक्ष पाहणी झाल्यानंतर पुढील महसुली प्रक्रिया आणि अहवालाच्या आधारे निर्णय अपेक्षित असून वस्तीवरील नागरिकांनीही सहकार्याची भूमिका घेतली आहे . या संपूर्ण प्रक्रियेमुळे उपस्थित नागरिकांमध्ये एक भावना स्पष्टपणे ऐकू आली तहसीलदार असावेत तर असे आणि अधिकारी असावेत तर असे.'' बेलेश्वर वस्तीसाठी ही पाहणी केवळ अधिकाऱ्यांची भेट नव्हती , तर प्रशासन लोकांपर्यंत पोहोचत असल्याची जाणीव होती

## पान १ वरून...

### १० दिवसांत शेतकरी कर्जमाफी

नावाने जाहीर करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या योजनेला सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भही प्राप्त होणार आहेत. शेतकऱ्यांना थेट लाभ मिळावा यासाठी प्रशासनिक पातळीवर तयारी अंतिम टप्प्यात पोहोचल्याचेही सांगितले जात आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच कर्जमाफीबाबत सकारात्मक संकेत दिले होते. राज्य सरकारची कर्जमाफी योजना अंतिम टप्प्यात असून ३० जूनपूर्वी निर्णय होऊ शकतो, असे त्यांनी म्हटले होते. पात्र शेतकऱ्यांना थेट लाभ पोहोचवण्यासाठी महसूल, सहकार आणि कृषी विभागामार्फत आवश्यक प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते. कृषिमंत्री भरणे यांच्या ताज्या घोषणेमुळे या प्रक्रियेला आता अधिकृत दुजोरा मिळाल्याचे मानले जात आहे.

----------

### राज्यातील कायदा-सुव्यवस्था

देवेंद्र फडणवीस होते. या दोन्ही आंदोलनावेळी मुख्यमंत्र्यांनी काय आश्वासन दिले होते, ते जाहीर करावे. आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा असेल, तर जातनिहाय जनगणना करावी. त्यातून मराठा समाजासह समाजांच्या आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो.

-----------

### महायुतीचा जागावाटपाच

आहे. नाशिक तसेच छत्रपती संभाजीनगर-जालना या जागांबाबतही मोठी रस्सीखेच बघायला मिळाली. भाजपने या दोनपैकी एका जागेची मागणी केली होती. अखेर नाशिकची जागा शिवसेनेकडे तर छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघ भाजपकडे देण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे, परभणी-हिंगोली आणि कोकणातील जागांवर दावा केला होता. अंतिम वाटाघाटींमध्ये पुण्यासह कोकणातील एक जागा राष्ट्रवादीच्या वाट्याला आली. त्यामुळे आता महायुतीत जागावाटपाचा प्रश्न निकाली निघाला असून निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग येणार आहे.

----------

### अहिल्यादेवीचा जीवनपट माझ्यासाठी

राजकीय नव्हे, तर सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात क्रांती घडवली. त्यांनी आदर्श न्यायदानाची व्यवस्था भक्कमपणे उभी केली. अन्यायग्रस्तांना न्याय देण्याचे काम त्यांनी केले. घाट, मंदिरे बांधताना, दानपुण्य करताना सरकारी तिजोरीतून खर्च न करता स्वतःच्या संपत्तीतून खर्च केला. महिला सैनिकांची स्वतंत्र तुकडी निर्माण करणाऱ्या त्या पहिल्या महिला शासक होत्या असेही सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या ३०० व्या जयंतीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार या स्वतः चौंडीला आल्या होत्या. राज्याची पहिली महिला उपमुख्यमंत्री म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना वंदन करण्याचा योग आला त्याबद्दल सुनेत्रा अजित पवार यांनी समाधान व्यक्त केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मदिनाच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त 'गोदावरी ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रे'चा भव्य शुभारंभही नुकताच करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे विचार, वारसा आणि विकास हा त्रिसूत्री मंत्र घेऊन ही यात्रा सुरू झाल्याचे सुनेत्रा अजित पवार यांनी स्पष्ट केले. शेवटी बोलताना सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, मुख्यमंत्र्यांनी यावर्षी सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये पात्र शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या योजनेला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' असे नाव देण्यात आले आहे. आदरणीय अजितदादांच्या प्रयत्नाने बारामतीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय सुरू झाले आहे. या महाविद्यालय आणि रुग्णालयाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले आहे. चौंडी येथील विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही यावेळी दिली.

-------------------

### जरांगे पाटलांचे उपोषण

शिष्टमंडळाला माघारी पाठवले होते. मात्र, परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पडद्यामागून हालचाली सुरू झाल्या.अंतरवली गावातील सरपंच पांडुरंग तारख यांच्या निवासस्थानी मराठा आरक्षण अभ्यासक, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप आमदार प्रसाद लाड यांची एक गुप्त बैठक पार पडली.या बैठकीत चर्चेतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर विखे पाटील आणि प्रसाद लाड पुन्हा एकदा जरांगे पाटलांकडे गेले. तब्बल दीड तास चाललेल्या सविस्तर चर्चेनंतर, सरकार आणि आंदोलनकर्ते एका निर्णयावर पोहोचले आणि त्यानंतरच मध्यरात्री जरांगे यांनी उपोषण सोडले.त्यानंतर ते छत्रपती संभाजीनगर मधील ग्यालस्की रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले.

----------

### राज्यात मान्सूनचे आगमन

नसून मान्सूनपूर्व वादळी पाऊस आहे. सद्यस्थितीनुसार, राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत अधिकृत मान्सूनच्या आगमनाची कोणतीही शक्यता नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असं आवाहन हवामान खात्याने केलं आहे. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, १ जूनपासून राज्यातील प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपारनंतर हवामानात मोठे बदल होऊन ढगाळ वातावरण निर्माण होईल. या भागात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय, कोकण किनारपट्टीच्या भागातही काही प्रमाणात पावसाच्या सरी कोसळतील असा अंदाज आहे. मे महिन्याच्या अत्यंत कडक आणि सुस्त करणाऱ्या उन्हाच्या तुलनेत आता आगामी आठवड्यात राज्यातील कमाल तापमानात काहीशी घट होणार आहे, ज्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून थोडा दिलासा मिळेल. मात्र, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भात कमाल तापमान अद्यापही ४० अंश सेल्सिअसच्या वरच कायम राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने स्पष्ट केले आहे की, आगामी काळात होणाऱ्या वादळी पावसाचा मान्सूनशी कोणताही थेट संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळमध्येच दाखल झालेला नाही. आगामी हवामान बदल आणि मान्सून विलंबाने येण्याची शक्यता लक्षात घेऊन कृषी विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची मार्गदर्शक नियमावली जाहीर केली आहे. शेतकऱ्यांनी १ जूनपासून सुरू होणाऱ्या केवळ मान्सूनपूर्व वादळी पावसावर अवलंबून राहून आपल्या शेतात पेरणीची घाई करू नये. मान्सूनचे अधिकृत आगमन होऊन पुरेसा पाऊस पडल्याशिवाय पेरणी केल्यास बियाणे वाया जाण्याची भीती असते.

--------

### खिंडकर, देशमुख यांच्या फिर्यादी खोट्या;

होते. पहिली तक्रार धनंजय पंडितराव देशमुख (रा. मस्साजोग, ता. केज, जि. बीड) यांच्या फिर्यादीवरून समाधान खिंडकर व इतर ३ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि भारतीय शस्त्र अधिनियमानुसार १९१/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. दुसरी तक्रार समाधान बाबुराव खिंडकर (रा. बेलवाडी, जि. बीड) यांच्या फिर्यादीवरून धनंजय देशमुख व इतर २ ते ३ जणांविरुद्ध पिस्तूल दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी १९२/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून बीड ग्रामीण पोलिसांनी तातडीने तपास चक्र फिरवून घटनास्थळ परिसरातील ३० मे रोजीच्या रात्री १०:०५ ते १२:०० वाजे दरम्यानचे फुटेज मिळवले. या फुटेजची बारकाईने पाहणी केली असता, त्यात कोणतीही छेडछाड झालेली नसल्याचे आणि फिर्यादींनी नमूद केलेली अशी कोणतीही घटना तिथे घडलीच नसल्याचे स्पष्ट झाल. तसेच पोलिसांनी घटनास्थळावरील प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदवून ते कलम १०५ अन्वये ई-साक्ष पोर्टलवर अपलोड केले आहेत. तांत्रिक पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबावरून दोन्ही बाजूंच्या तक्रारी पूर्णपणे खोट्या आणि बनावट असल्याचे सिद्ध झाले आहे. दोन्ही गुन्ह्यांतील फिर्यादींनी वैयक्तिक कारणातून किंवा जाणूनबुजून पोलीस ठाण्यात खोटी तक्रार देऊन कायद्याचा गैरवापर केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस आता माननीय न्यायालयात सविस्तर अहवाल सादर केला जाणार असून, दिशाभूल करणाऱ्यांवर पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल. कोणत्याही कारणास्तव पोलीस व न्याय यंत्रणेचा गैरवापर करू नये. खोटी तक्रार देणे, खोटे आरोप करणे, किंवा दिशाभूल करणारी माहिती देणे हा गंभीर प्रकार आहे. असे उल्लंघन आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, पोलीस अधीक्षक यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

-----------

### मराठा आंदोलकाचा

या अपघातात इंदापूरमधील मराठा आंदोलकाचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात बीडजवळील मांजरसुंबा परिसरात घडला. या घटनेची माहिती मिळताच बीडमधील स्थानिक मराठा समन्वयकांनी तातडीने रुग्णालयात धाव घेतली. त्यांनी दोन्ही जखमी कार्यकर्त्यांना बीडच्या एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असून, त्यांच्या संपूर्ण उपचाराची जबाबदारीही या समन्वयकांनी स्वत:वर घेतली आहे.

------------

### देव मंत्र्यांची वाट पाहत नाही,

विचार करू नये की ते कधीही मंदिरात जाऊ शकतात आणि देव त्यांची वाट पाहत असतील. आपल्याला व्हीआयपी दर्शनाची गरजच काय? देवाच्या दरबारात सर्वजण समान आहेत, असे स्पष्ट करत सशुल्क व्हीआयपी दर्शन बंद केल्यास मंदिरांच्या महसुलाचे नुकसान होईल, हा राज्याचे अतिरिक्त महाधिवक्ता पी.व्ही. बालसुब्रमण्यम यांचा युक्तिवाद खंडपीठाने फेटाळून लावला. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी सहा आठवड्यांसाठी पुढे ढकलली आहे. मागील सुनावणीदरम्यान सुट्टीकालीन पीठाने, तिरुप्पारनकुंड्रम मंदिर प्रशासनाने नवीन मंत्री आर. निर्मलकुमार आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दर्शन घेता यावे यासाठी निर्धारित वेळेपेक्षा जास्त वेळ मंदिर उघडे ठेवून नियमांचे उल्लंघन केले होते का? याच्या चौकशीचे आदेश दिले होते.

# महाराष्ट्र योग असोसिएशनच्या राज्य अध्यक्षपदी विकास गवते यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

पुणे येथे दिनांक ३० मे रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र योग असोसिएशन च्या सभेत महाराष्ट्र योग असोसिएशन च्या राज्य अध्यक्षपदी बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र श्री विकास गवते सर यांची निवड करण्यात आली आहे. तसेच असोसिएशन चे सरचिटणीस म्हणून चंद्रकांत पांगारे सर यांची निवड करण्यात आली. चेअरमन पदावर पुणे येथील प्रसिद्ध केंब्रिज इंटरनॅशनल स्कूल चे संचालक श्री राम रैना सर यांची निवड करण्यात आली. कार्यकारी सचिव म्हणून श्री जतिन सोळंकी व कार्याध्यक्ष पदावर डॉ अनिता



पाटील यांची निवड करण्यात आली.योगा फेडरेशन ऑफ इंडिया व महाराष्ट्र योग असोसिएशन यांच्या वतीने जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर घेतलेल्या जाणाऱ्या योग स्पर्धांच्या माध्यमातून योगासनाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी ही निवड करण्यात आली आहे. या वेळी राजस्थान जयपूर येथील प्रसिद्ध योग गुरु श्री ढाकाराम जी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. श्री विकास गवते सर यांची महाराष्ट्र योग असोसिएशन चे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल बीड जिल्ह्यातील योग क्षेत्रातील विविध मान्यवर यांनी पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले.

cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. ०१ जून २०२६





माजलगाव:– लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर, तेलगाव कार्यालयात दि ३१ मे रविवार रोजी पुण्यश्लोक लोककल्याणकारी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करनेत आली. प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, अशोक पाटिल, राजेश देशमुख, माणिक सोळंके, नागोराव निर्मळ, महादेव मुरकुटे, दिगंबर विर,गोरख वाशिंबे,धनंजय सोळंके,अभिजित मोरे

## सत्कार भारत मातेच्या सुपुत्राचा...



दिंद्रुड । प्रतिनिधी

केंद्रीय राखीव पोलीस दलातील (CRPF) हेड कॉन्स्टेबल श्री. अनिल प्रल्हाद बडे यांच्या गौरवशाली सेवा निवृत्ती निमित्त खोलेश्वर मल्टिस्टेट, शाखा नित्रुड येथे त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. देशसेवेसाठी आयुष्याची अमूल्य वर्षे अर्पण करून राष्ट्रसेवेचे कर्तव्य निष्ठेने पार पाडणाऱ्या श्री. बडे यांचा हा सत्कार संस्थेसाठी अभिमानाचा क्षण ठरला. यावेळी संस्थेचे हितचिंतक श्री. रामदीप बप्पा डाके, संस्थेचे खातेदार तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी श्री. बडे यांच्या देशसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांना निरोगी, आनंदी व यशस्वी निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. देशसेवेचा गौरव, कर्तृत्वाचा सन्मान आणि भारत मातेच्या सुपुत्राला मानाचा मुजरा!




गेवराई :आज जिल्हा कार्यक्रमाधिकारी कुलकर्णी व मादळमोही रुग्णालयाचे डॉक्टर लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मिशन एडससुरक्षा अंतर्गत आयसीटीसी गेवराईचे समुपदेशक सरवदे प्रयोगशाळा तंत्रज्ञ , तिडके व आशा सुपरवायझर सौ गुंजकर यांच्या संयुक्त विद्यमानाने पी एस सी मादळमोही येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमात एड्स संबंधी , ,९५-९५-९९ चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे एड्स मिशन सुरक्षा कार्यक्रम सक्सेस करण्यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे एच आय व्ही टीबी सिपिलीस .,१०९७ टोल फ्री क्रमांक, २०१७ चा कायदा २०१७ चा कायदा बद्दल माहिती दिली माहिती दिली तसेच आशा वर्कर आशा वर्कर यांना आईशी वाटप करून एन सी च्या आहाराबद्दल चे महत्व रक्ताच्या तपासण्या करण्याचे महत्त्व इत्यादी बद्दल मार्गदर्शन करण्यात आले

## स्वा.सावरकर जयंतीच्या निमित्ताने पेशवा प्रतिष्ठान तर्फे बिनव्याजी शैक्षणिक मदतीचे वाटप



अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजातील गरजू गुणवंत विद्यार्थ्यांना पेशवा प्रतिष्ठान तर्फे बिनव्याजी शैक्षणिक मदत केली जाते. यावर्षी स्वातंत्रवीर सावरकर जयंतीनिमित्त पार्थ कानसुरकर यास बिनव्याजी शैक्षणिक मदतीचे वाटप करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते पन्नास हजार रुपयाचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. सर्वप्रथम स्वा सावरकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी गट शिक्षण अधिकारी व्यंकटेश कुलकर्णी, विवेक देशमुख, राहुल कुलकर्णी, डॉ महेश अकोलकर, शिरीष हिराळकर, डॉ संकेत तोरंबेकर, विवेक बाभुळगावकर,श्रीकांत जोशी,अक्षय देशमुख, केदार दामोशन, गौरव कुलकर्णी, विलास कानसुरकर यांची उपस्थिती होती.

# दिंद्रुडच्या सरस्वती नदीला मिळणार नवसंजीवनी

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा शुभारंभ

दिंद्रुड । प्रतिनिधी

पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या आणि भविष्यातील जलसुरक्षेला बळ देणाऱ्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला रविवारी दिंद्रुड येथे उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. ग्लोबल विकास ट्रस्ट आणि सर दोराबजी टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सरस्वती नदीच्या खोलीकरण व पुनरुज्जीवन प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमामुळे दिंद्रुडसह परिसरातील जलसंधारणाला नवी दिशा मिळणार असून, भविष्यात हा संपूर्ण परिसर जलसमृद्ध होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

जलसंधारण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी आणि ट्रस्टी संजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा परळी वैजनाथ, अंबाजोगाई, धारूर व माजलगाव तालुक्यातील पापनाशी, गुणवारा,वान आणि सरस्वती या नद्यांच्या पुनरुज्जीवनाचा व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत तब्बल १०८ किलोमीटर लांबीच्या नदीपात्रांचे खोलीकरण व रुंदीकरण केले जात असून,



शाश्वत जलव्यवस्थापनासाठी अत्यंत प्रभावी मानली जाणारी जी.आर.ए (जलधरस्तराद्वारे भूजल पुनर्भरण)संकल्पनाही राबविण्यात येत आहे. नदीपात्रात बोअर घेऊन पाणी थेट जमिनीत मुरवण्याच्या या अभिनव पद्धतीमुळे भूजलपातळी वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

दिंद्रुड येथील सरस्वती नदीच्या खोलीकरण आणि रुंदीकरण कामाचा शुभारंभ ग्रामस्थांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर आणि ग्लोबल विकास ट्रस्टचे प्रतिनिधी दत्तात्रय काळे यांच्या हस्ते यंत्रसामग्रीची पूजा करून श्रीफळ वाढवण्यात आले. कार्यक्रमास ट्रस्टचे मुख्य लेखापाल श्याम पम्मी, गुलाब रूपनर, महालिंग रुद्राक्ष, तलाठी प्रमोद चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रकल्पांतर्गत सरस्वती नदीचे सुमारे पाच किलोमीटर अंतरापर्यंत खोलीकरण करण्यात येणार आहे. नदीच्या दोन्ही काठांवर रस्ते विकसित करण्यात येणार असून व्यापक वृक्षलागवड अभियान देखील राबविले जाणार आहे. तसेच दर १५० मीटर अंतरावर नदीपात्रात बोअर घेऊन पाणी जमिनीत मुरविण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती श्याम पम्मी यांनी दिली.विशेष म्हणजे, लोकसहभागातून साकार होत असलेल्या या प्रकल्पासाठी दिंद्रुड ग्रामस्थांनी स्वतःहून सुमारे १४ लाख रुपयांचा निधी उभारला आहे. ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग, सामाजिक बांधिलकी आणि जलसंवर्धनाची जाणीव यामुळे हा प्रकल्प भविष्यात आदर्श ठरणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

जलक्रांतीकडे वाटचाल

दिंद्रुडच्या सरस्वती नदीच्या पुनरुज्जीवनामुळे केवळ नदीचे अस्तित्व मजबूत होणार नाही, तर परिसरातील विहिरी, बोअरवेल, शेती आणि भूजलसाठ्यांनाही नवसंजीवनी मिळणार आहे. लोकसहभाग, आधुनिक जलव्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धन यांचा संगम असलेला हा उपक्रम भविष्यातील जलक्रांतीचा पाया ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## विविध शेतकरी प्रशिक्षणाचा बीड जिल्हयातील शेतकरी बंधु भगिनींनी लाभ घ्यावा –सुभाष साळवे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), बीड यांचे मार्फत भारतीय कृषी अनुसंधान परिषद श्री सिध्दगीरी कृषी विज्ञान केंद्र कन्हेरी जि कोल्हापुर येथे नैसर्गीक /सेंद्रीय शेती विषयाचे तिन दिवसीय प्रशिक्षण अयोजीत केले आहे. सदर प्रशिक्षणामध्ये सेंद्रिय शेती जमीन व अन्नद्रव्य व्यवस्थापणासाठी निविष्ठा, घटक, उपयोग, निर्मिती व वापरए सेंद्रिय शेती कीडरोग व्यवस्थापनासाठी विविध निविष्ठा, घटक, उपयोग, निर्मिती व वापर, बिजामृत तयार करून बीज प्रक्रिया, सेंद्रिय शेती प्रमाणीकरण, कार्यपद्धती, मानके व एफ.पी.ओ.,अभिलेख व्यवस्थापन, नैसर्गिक व सेंद्रिय शेतीमध्ये पशुधनाचे महत्व ईत्यादी विषयाचे मार्गदर्शन मिळणार आहे.

वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट, मांजरी पुणे येथे आधुनिक ऊस उत्पादन या विषयाचे तिन दिवसीय निवासी प्रशिक्षण आयोजीत करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणामध्ये ऊसाचे भरघोस उत्पादन घेणे, खतांचा संतुलीत वापर, पाणि व्यवस्थापन ईत्यादी विषयाचे मार्गदर्शन मिळणार आहे. राष्ट्रीय वनस्पती स्वास्थ प्रबंधन संस्थान, , राजेंद्र नगर हैद्राबाद येथे नैसर्गिक शेती, ची स्थापना, ड्रोन तंत्रज्ञान, वनस्पती आरोग्य विषयक उपाययोजना या विषयाचे ५ दिवसीय प्रशिक्षण आयोजीत केलेले आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास बोर्ड आनंद गुजरात येथे दुध उत्पादन व दुग्धजन्य पदार्थ तयार करणे विक्री व व्यवस्थापन प्रात्यक्षीकाव्दारे प्रशिक्षण होणार आहे.वरील प्रशिक्षणा करीता प्रवास, निवास, भोजन व प्रशिक्षण फी ची व्यवस्था मार्गदर्शक सुचनेनुसार मापदंडाच्या मर्यादेत आत्मा बीड कार्यालया मार्फत करण्यात येणार आहे. मापदंडापेक्षा जास्तीचा खर्च होणार असल्यास लोकवाटा भरण्यास लाभार्थींची तयारी असावी तसेच प्रशिक्षण पुर्ण वेळ उपस्थित राहून पार पाडणे व प्रशिक्षणा वरून परतल्यानंतर आपल्या प्रक्षेत्रावर अंमलबजावणी करण्यास तयार असावा त्यासाठी नाव नोंदणी चालु झालेली असून प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्रथम प्राधन्य देण्यात येणार आहे. शेतकरी बंधु भगीनी यांनी १) आधार कार्ड २) ७/१२ उतारा ३) ८ अ उतारा ४) फार्मर आय.डी. ५) बँक पासबुकची झेरॉक्स ६) जात प्रमाणपत्र कागदपत्रासह विनंती अर्ज शेतकरी बांधवांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील आत्मा शाखेतील बीटीएम व एटीएम यांचेशी संपर्क साधून सादर करावा तसेच बीड जिल्हयातील शेतकरी बांधवानी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा तसचे बीड जिल्हयातील शेतकरी बंधु भगीनींना आवश्यक असलेल्या शेतकरी प्रशिक्षण, अभ्यासदौरा बाबत अर्ज संबंधीत तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील आत्मा शाखेश सादर करावा उपलब्ध निधीनुसार कार्यक्रम आयोजीत करण्यात येईल असे अवाहन प्रकल्प संचालक आत्मा बीड श्री सुभाष साळवे यांनी केले आहे.

पान ६ वरुन...

### शिवाजीनगर पोलिसांची कामगिरी

याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १३६/२०२६, कलम ३०५, ३३१ (४) इछड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अपर अधीक्षक श्री समीर शेख, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री व्यंकट राम यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ यांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली.

पोलीस पथकाने गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेतला. गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या दोन तासांच्या आत आरोपी शेख शाहिंशाह शेख बशीर (रा. इस्लामपुरा, बीड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेल्या दोन्ही मशीन सुखरूप जप्त केल्याकेल्या सदरची धडाकेबाज कामगिरी पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली पोलीस जमादार विकास रेवाळे, रवींद्र आघाव, ज्ञानेश्वर मराडे, अनिल घटमळ, बाळू रहाडे, दिलीप राठोड आणि आबेद पठाण यांच्या पथकाने केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस जमादार विकास रेवाळे हे करत आहेत.

### डॉ.ओमप्रकाश शेटे यांची सुरक्षा

लोकहिताची कामे करण्यास भाग पाडणाऱ्या लोकप्रतिनिधींना संसदपटू म्हणून पुरस्कार दिला जातो. मात्र उठ सूट कोणाचीही तक्रार करणाऱ्या माजलगावच्या आमदारांना तक्रारपट्टू पुरस्कार द्यावा अशी मागणीही युवा नेते शहाजी सोळंके यांनी पत्रकात केली आहे. आमदार सोळंकेनी डॉ.शेटे यांच्या गाडीवरील महाराष्ट्र शासन या नावावर देखील आक्षेप घेतला आहे.परंतु त्यांच्या कुटुंबातील सर्वजण आमदार नाव लिहिलेली व राजमुद्रा असलेल्या गाड्या वापरतात याचा त्यांना सोयीस्कर विसर पडलेला दिसतोय. त्यामुळे त्यांनी दुसऱ्याला नैतिकता शिकवताना किमान एकदा तरी आरशात पाहायला हवं असेही शहाजी सोळंके यांनी पत्रकात म्हटले आहे.तसेच डॉ. ओमप्रकाश शेटे हे दर आठवड्याला माजलगाव मतदार संघात जनता दरबार भरवतात. त्यात अनेकांची प्रश्न मार्गी लावले जातात.विविध विकास कामांच्या माध्यमातून त्यांनी वाढवलेला जनसंपर्क कदाचित आमदार सोंषकेच्या डोळ्यात खुपत असावा असा संशय ही शहाजी सोळंके यांनी व्यक्त केला आहे. तसेच डॉ.ओमप्रकाश शेटे यांचे विधान परिषदेच्या संभाव्य यादीत आलेले नाव आमदार सोळंकेंना कदाचित पचनी पडले नसावे, आणि म्हणूनच हा तक्रारीचा घाट घातला असावा असेही शहाजी सोळंके यांनी पत्रकात म्हटले आहे.

### नवनाथ बाबा मुळे टेकडीची व्याप्ती

संत संगती काळाची गरज आहे असे अभंग विवेचन केले श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अधिक मास निमित्त प्रतिपौर्णिमेप्रमाणे अधिक मास पौर्णिमेनिमित्त ह भ प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांचे हरिकीर्तन आयोजित करण्यात आले होते अधिक मासानिमित्त ची महापंगत बाभळखुट्टा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली यावेळी टाळकरी, माळकरी, भजनी मंडळी मृदुंगाचार्य ,गायनाचार्य परिसरातील हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

### वल्लभ कुलकर्णीची धडाकेबाज

आपली कामगिरी निश्चितपणे चांगली करण्यासाठी त्याचा संकल्प दृढ झाला आहे.त्याच्या या यशाबद्दल सर्व क्रीडा प्रेमी मध्ये कौतुक होत आहे.

प्रथम सामना इव्हान दुबे मुंबई सब अर्बन (पराभव) द्वितीय सामना अथियान लेन मुंबई सिटी (विजय )तिसरा सामना विराज लोखंडे वाशिम (विजय )चतुर्थ सामना जियान फटणानी मुंबई सब अर्बन (विजय) पाचवा सामना विरांश बारी पालघर(पराभव )सहावा सामना सक्षम भाकरे नाशिक (विजय ) सातवा सामना अवीर शहा मुंबई सब अर्बन (विजय )आठवा सामना पुणे खेळाडू रितेश कुलकर्णी (विजय )

## सिरसाट, वंजारे,कोठेकर व किर्दंत यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने निरोप समारंभ

परळी । प्रतिनिधी

औष्णिक विद्युत केंद्र परळी येथील अति. कार्यकारी अभियंता भीमराव माणिक सिरसाट , मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक महादेव सखाराम वंजारे ,कोळसा हाताळी विभागातील श्रेणी -२ सुधीर वसंतराव कोठेकर व तंत्रज्ञ १ दिपक जनार्धनराव किर्दंत यांना दि.२९ मे २०२६ रोजी सायं ५ वा. प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार व निरोप देण्यात आला.



या सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांना मुख्य अभियंता सुनिल इंगले यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. परळी औष्णिक विद्युत केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे भविष्यातही उत्तम प्रकारे चालू ठेवण्याचा प्रयत्न राहील असे प्रतिपादन सेवापूर्ती कार्यक्रमात मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी अध्यक्षीय समारोपात केले. या प्रसंगी प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार यांनी देखील मार्गदर्शन केले. या वेळी सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता एस एस भागवत,अधीक्षक अभियंता राजू रेड्डी, अधीक्षक अभियंता धनंजय कोकाटे, वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरणे, कार्यकारी अभियंता पंकज दगडे,कार्यकारी अभियंता मदन पवार, उपकार्यकारी अभियंता शिवाजी होटकर, शाहूराव येवते, उप कार्यकारी अभियंता डी एस डोंगरे,कार्यकारी रसायनतंत्रज्ञ सतीश मुंडे, मानव संसाधन विभागाचे विलास ताटे,श्रीगणेश मुंडे, सुनिल पवार, पसारे साहेब, गरड साहेब,कामगार नेते हरीराम गित्ते ,संदीप पाटील आदींची उपस्थिती होते या प्रसंगी मित्र सहकारी कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सेवानिवृत्ती अधिकाऱ्याची चित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गजले यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सहायक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी मानले.

## अभिजित सुगावकर रोटरी सक्षम तर निवृत्ती तोडकर रोटरी आत्मनिर्भर पुरस्काराने सन्मानित

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिव्यांगत्वावर मात करत समाजात सक्षमपणे कार्यरत असलेले वैद्यनाथ बँकेचे व्यवस्थापक अभिजित सुगावकर यांना रोटरी सक्षम तर प्रयोगशील शेतकरी निवृत्ती तोडकर यांना रोटरी आत्मनिर्भर पुरस्काराने शाल,श्रीफळ, व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने आई फंगशन हॉल येथे वोकेशनल सर्व्हिस अवॉर्ड या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे, उप प्रांतपाल प्रवीण देशपांडे, रोटरीच्या अध्यक्षा रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, संगीता लातुरे, यांच्या हस्ते अभिजित सुगावकर व निवृत्ती तोडकर यांना




सन्मानित करण्यात आले. अभिजित सुगावकर हे दिव्यगत्वावर मात करून गेल्या २५ वर्षांपासून वैद्यनाथ बँकेत ग्राहकांना सेवा देत आहेत. तर तोडकर यांनी आपल्या शेतीत गायगोठा,दूध उत्पादन, पशुखाद्य असे प्रकल्प ग्रामीण भागात सुरू केले. व आत्मनिर्भर शेतकरी कसा असावा. याचा प्रेरणादाई आदर्श समोर ठेवला.असे सुधीर लातुरे यांनी आपल्या भाषणात सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहिणी पाठक यांनी केले.संचलन डॉ.प्रिया नागरगोजे यांनी तर उपस्थितांचे आभार वसुधा गडसिंग यांनी मानले.या कार्यक्रमास महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सर्पदंशाने विद्यार्थ्यांचा मृत्यू

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील बेळगाव ग्रामपंचायत अंतर्गत बेळगाववस्ती येथील एका शेतकरी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सर्पदंशामुळे दहा वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाला; मात्र बीड जिल्हा रुग्णालयातील संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रकरणाची कोणतीही नोंद न घेतल्याने हे कुटुंब शासनाच्या राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेपासून वंचित राहिल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.



बेळगाववस्ती येथील शेतकरी रोहिदास कोळपे हे आपल्या कुटुंबासह घरासमोरील अंगणात झोपले होते. पहाटे सुमारे चार वाजण्याच्या सुमारास इयत्ता चौथी उत्तीर्ण झालेला त्यांचा दहा वर्षीय मुलगा सोहम रोहिदास कोळपे झोपेतच किंचाळला. त्याने आपल्या उजव्या पायावर साप चावल्याचे सांगितले. तपासणी केली असता पिंडरीवर दातांच्या खुणा व रक्त दिसून आले. त्यामुळे घाबरलेल्या कुटुंबीयांनी तातडीने वाहन करून त्याला बीडकडे उपचारासाठी नेले.प्रथम एका खासगी रुग्णालयात दाखल करण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र तेथे उपचार न मिळाल्याने सोहमला जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास ओपीडीतील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मात्र कोणतीही वैद्यकीय नोंद, पोलिस माहिती अथवा आवश्यक प्रक्रिया न करता कुटुंबीयांना मृतदेह घेऊन जाण्यास सांगितले. सोहम कोळपे यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करून सानुग्रह अनुदान मिळवून द्यावे, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंकी यांच्याकडे केली आहे.

## चनई येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

चनई येथे लोकमाता, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व उपस्थितांनी त्यांना विनम्र अभिवादन केले.

यावेळी गावच्या सरपंच रोहिणी सावरे, उपसरपंच अनिल शिंदे, ग्रामसेवक देशमुख साहेब, बार्टीचे समतादूत व्यंकटेश जोशी यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या न्यायप्रियता,




लोककल्याणकारी दृष्टीकोन आणि आदर्श प्रशासनाचा वारसा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

वक्त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी प्रजाहिताला सर्वोच्च स्थान देत पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण केला. समाजहित, धर्मकार्य आणि जनसेवेच्या माध्यमातून त्यांनी इतिहासात अजरामर स्थान मिळविले असून त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे. कार्यक्रमास गावातील महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

cmyk

# कांदा उत्पादकांसाठी १० हजार कोटींचे विशेष पॅकेज द्या

## महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेची मागणी

नाशिक / प्रतिनिधी

देशातील कांदा उत्पादक शेतकरी मागील अनेक वर्षांपासून चुकीची निर्यात धोरणे, नैसर्गिक आपत्ती, बोगस बियाणे, साठवणूक नुकसान आणि सततच्या भावपडीमुळे आर्थिक संकटात सापडले आहेत. सन २०१९, २०२० आणि २०२३-२४ मधील कांदा निर्यातबंदी, ४० टक्के निर्यात शुल्क, ८५० व ५५० डॉलरचे किमान निर्यात मूल्य, नाफेड व एनसीसीएफमार्फत बफर स्टॉक मधील कांदा देशात स्वस्त दरात वितरित करून सरकारने बाजारात केलेल्या हस्तक्षेपामुळे तसेच २०२५ आणि २०२६ मधील अत्यल्प बाजारभाव मिळाल्याने मागील काही वर्षात लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने यांनी सरकारकडे १० हजार कोटींचे विशेष कांदा आर्थिक पुनरुत्थान पॅकेज जाहीर करण्याची मागणी केली आहे.



यासाठी विविध मागण्या करण्यात आल्या असून, त्यात गेल्या अनेक वर्षांपासून झालेल्या भावपड आणि आर्थिक नुकसानीची भरपाई म्हणून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट आर्थिक मदत जमा करावी. २०२५ मध्ये साठवणूक केलेल्या कांद्याला तसेच २०२६ मध्ये विक्री झालेल्या कांद्याला अत्यल्प बाजारभाव मिळाल्याने झालेल्या नुकसानीसाठी विशेष भरपाई द्यावी. अतिवृष्टी, गारपीट, अवकाळी पाऊस, महापूर, दुष्काळ आणि रोगराईमुळे झालेल्या कांदा पिकाच्या नुकसानीसाठी विशेष आर्थिक सहाय्य द्यावे. निकृष्ट व बोगस कांदा बियाण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देऊन संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई करावी. प्रमाणित कांदा बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांना विशेष अनुदान द्यावे, जेणेकरून उत्पादन खर्च कमी होईल व दर्जेदार उत्पादन वाढेल. कांदा साठवणूक चाळी, आधुनिक गोदामे आणि साठवणूक सुविधा फक्त प्रत्यक्ष कांदा उत्पादक शेतकऱ्यांनाच १०० टक्के अनुदानावर उपलब्ध करून द्याव्यात यामध्ये कांदा उत्पादन करणाऱ्याच शेतकऱ्यांचा समावेश असावा. शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था व संघटनांना थेट ग्राहकांपर्यंत कांदा विक्री करता यावा यासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा. नाशिक, अहिल्यानगर, पुणे, बीड, सातारा, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धुळे, सोलापूर, बीड व इतर प्रमुख कांदा उत्पादक जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कांदा प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी विशेष आर्थिक तरतूद करावी. कांदा पावडर, कांदा फ्लेक्स, डीहायड्रेटेड कांदा, कांदा पेस्ट व इतर मूल्यवर्धित उत्पादनांसाठी शेतकरी मालकीचे उद्योग उभारण्यास प्रोत्साहन द्यावे. कांदा निर्यात वाढविण्यासाठी स्वतंत्र निधी स्थापन करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये भारतीय कांद्याला प्रोत्साहन द्यावे. वारंवार निर्यातबंदी, निर्यात शुल्क आणि किमान निर्यात मूल्य लागू करण्याऐवजी दीर्घकालीन व शेतकरी हिताचे स्थिर राष्ट्रीय कांदा धोरण जाहीर करावे. कांद्याचे भाव कोसळल्यास शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक संरक्षण मिळावे यासाठी स्वतंत्र निधी निर्माण करावा. साठवणूक केलेला कांदा तातडीने विकण्याची वेळ येऊ नये म्हणून शेतकऱ्यांना व्याजमुक्त किंवा अत्यल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून द्यावे. कांदा खरेदी, साठवणूक, प्रक्रिया व विपणनासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांना विशेष आर्थिक सहाय्य द्यावे. कांदा उत्पादकांच्या हिताचे संरक्षण, बाजारभाव स्थिरता, निर्यात, साठवणूक, प्रक्रिया उद्योग व विपणन व्यवस्थापनासाठी स्वतंत्र राष्ट्रीय कांदा उत्पादक महामंडळ स्थापन करावे. देशातील लाखो कांदा उत्पादक शेतकरी सध्या अभूतपूर्व आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. ग्राहक हिताचे नाव पुढे करून कांदा उत्पादकांवर अन्याय करणारी धोरणे आता थांबविण्याची वेळ आली आहे. केंद्र सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन १० हजार कोटींचे विशेष कांदा आर्थिक पुनरुत्थान पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने केली आहे.

# पावसात सोलर पॅनलचे नुकसान झाल्यास अशी करा तक्रार



अनेकदा पावसाळ्यात वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्यांनतर शेतात उभारलेल्या सोलर पॅनलचे अतोनात नुकसान होते. जोरदार वाऱ्याच्या झोतामुळे पॅनलची संरचना कोसळून काही भाग तुटतो, तर काही साहित्य दूरवर फेकले जाते. अशावेळी कुणाकडे दाद मागावी, कंपनी नुकसान भरून देते का, सोलर पॅनल दुरुस्त करून देते,याची माहिती असणे आवश्यक आहे. सोलर पॅनलचे नुकसान झाले असल्यास सर्वप्रथम त्याची तपशीलवार छायाचित्रे आणि व्हिडिओ काढा. जर नुकसान गारपीट, वादळ किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे झाले असेल, तर विम्याचा दावा करण्यासाठी पुरावे म्हणून हे खूप महत्त्वाचे ठरतील. वीज पुरवठा त्वरित खंडित करा : तडा गेलेले पॅनल किंवा तुटलेल्या तारांमुळे शॉक लागण्याचा किंवा शॉर्ट सर्किट होण्याचा धोका असतो. म्हणून इन्व्हर्टर आणि डीसी स्विच बंद करून यंत्रणा त्वरित पूर्णपणे बंद करा.

इन्स्टॉलर (विक्रेत्याशी) संपर्क साधा : ज्या कंपनीकडून किंवा एजन्सीकडून तुम्ही सोलर पॅनल बसवले आहेत, त्यांना फोन करून नुकसानाची माहिती द्या. कंपनीचे तंत्रज्ञ येऊन पॅनलची दुरुस्ती किंवा बदल करू शकतील.

वॉरंटी तपासा : सोलर पॅनेलला सर्वसाधारणपणे १० ते २५ वर्षांची उत्पादक वॉरंटी असते. जर नुकसानाचे कारण नैसर्गिक नसून उत्पादनातील दोष किंवा निकृष्ट दर्जा असेल, तर पॅनल मोफत बदलून मिळू शकते.

विमा दावा : तुमच्या घराचा किंवा शेताचा सर्वसमावेशक विमा असेल, तर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानासाठी तुम्ही विमा कंपनीकडे क्लेम करू शकता.

सरकारी योजनेतील पॅनल असल्यास : जर तुम्ही मागेल त्याला सौर कृषी पंप किंवा तत्सम कोणत्याही सरकारी योजनेतून पॅनल बसवले असेल, तर लवकरात लवकर संबंधित कृषी विभाग किंवा महावितरण कार्यालयाशी संपर्क साधा. नियमानुसार, काही विशिष्ट योजनांमध्ये ठराविक कालावधीत नुकसान दुरुस्त करून किंवा बदलून मिळण्याची तरतूद असते.

# नारळाच्या शेतीतील धोके आणि योग्य व्यवस्थापन

कल्पवृक्ष म्हणून ओळख असणाऱ्या नारळच्या देखील शेतीवर रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी अडचणीत येत असतात. सतत बदलणारे वातावरण आणि उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे नारळाची शेती संकटात सापडली आहे. उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या पुढे नव्या संकटाला तोंड फुटले आहे. या झाडांवर किडआळीचा प्रादुर्भाव वाढल्याने नारळ उत्पादनात घट होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. शिवाय या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रसार होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे नारळाची शेती अडचणीत येऊ नये याकरिता बारामती कृषी विज्ञान केंद्राने या समस्येवर वेळीच प्रतिबंधात्मक उपायोजना राबविण्यासाठी पुढाकार घेतल्याचे सांगण्यात येत आहे. तर याबाबत शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शनशिबीर देखील हाती घेण्यात आली आहेत.

कोकणात सर्वाधिक नारळाची शेती केली जात असून नारळाच्या लागवड क्षेत्रासह उत्पादनात राज्याचा समावेश पहिल्या दहा राज्यांमध्ये आहे. त राज्यातील विविध जिल्हांमध्ये देखील नारळ शेतीचा प्रयोग सुरु असून नारळ लागवडीचे क्षेत्र राज्यात झपाट्याने वाढत आहे. नारळावरील किडीचा प्रादुर्भाव : किडीचा प्रकार प्रथम झाडांच्या झावळ्या पोखरण्याचे काम करतो.



परिणामी झावळ्या सुकून प्रकाश संश्लेषण क्रियेअभावी उत्पादनात घट येते. नारळाच्या खालच्या बाजूच्या पानांवर सुकलेले ठिपके पडतात तर प्रादुर्भाव वाढल्यास पाने जळून मोठे नुकसान होते. शिवाय या किडीचा प्रादुर्भाव लहान मोठ्या सर्व नारळाच्या झाडांवर होत आहे. जास्त प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने झावळ्या, मोहोर आणि अपरिपक्व नारळाची फळे गळण्याचे प्रमाण वाढते.प्रतिबंधात्मक उपाय : या समस्येवर वेळीच प्रतिबंधात्मक उपाय जोजना राबविण्यासाठी ॲग्रीकल्चरल डेव्हलमेंट ट्रस्ट बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राने पुढाकार घेतल्याची माहिती समोर येत आहे. अधिक प्रादुर्भाव पसरू नये म्हणून उन्हाळी हंगामाच्या सुरुवातीलाच प्रथमतः प्रादुर्भावग्रस्त आढळणारी पाने कापून जाळवीत. रासायनिकरित्या फ्रॉन्ड्सच्या खालच्या पृष्ठभागावर मॅलेथिऑन ५० ०.०५% (१/), क्विनॅलफॉस ५० ०.०५%(१/) यांची फवारणी केल्यास प्रादुर्भाव आटोक्यात येतो. नारळावरील या अळीला परजिवीकरण करताना गोनिओझस मित्र किटकांचा वापर करावा. अळ्या परोपजीवींमध्ये, बेथिलिड, गोनिओझस नेफँटिडिस आणि ब्रॅचिमेरिया नोसाटोई-केएयू हे कीड नियंत्रित करण्यासाठी सर्वात प्रभावी आहेत. यामुळे काही विशिष्ट्य प्रकारे जर तुम्ही याकडे लक्ष दिले तर यावर देखील चांगला उपाय सापडून आपले उत्पादन वाढण्यास त्याठिकाणी मदत होणार आहे.

# जमिनीच्या प्रकारानुसार पिकांची निवड महत्त्वाची

पिकाची निवड करताना पाण्याची उपलब्धता, उत्पादन आणि बाजारभाव यांचा जितका विचार करतो. त्याचप्रमाणे जमिनीच्या प्रकारानुसार पिकाची निवड करणे अतिशय महत्त्वाचे आहे. प्रत्येक प्रकाराच्या पिकाची वाढ, त्याच्या गरजा वेगवेगळ्या असतात. त्यामुळे जमीन आणि पीक हे एकमेकांना पुरेपुर असायला हवे. यामुळे पिकांची उत्तम वाढ होते, पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होतो आणि उत्पादनात भरघोस वाढ होते.

हलकी जमीन : या जमिनीची खोली उथळ म्हणजे साधारणत: २५ सेंमी. पेक्षा कमी असते. त्यामुळं ही जमीन मुरमाड किंवा वालुकामय असते. त्यामुळे या जमिनीत पाण्याचा निचरा लवकर होतो. कृषि विद्यापीठांच्या शिफारशीनुसार हलक्या जमिनीत बाजरी कुळीथ, तीळ, हुलगा, चवळी, आणि कमी कालावधीत येणारा भाजीपाला अशी पिके घ्यावीत.

मध्यम जमीनः मध्यम जमिनीत पाण्याचा निचरा चांगला होतो. या जमिनीची खोली २५ ते ४५ सें.मी. इतकी असते. त्यामुळे खरिपातील बहुतांश पिकांसाठी ही जमीन योग्य असते. जसे सोयाबन, मका, खरिप ज्वारी, बाजरी, मूग, उडिद, सूर्यफूल, तूर आणि भूईमूग ही पिके घेण्याची शिफारस आहे. तर फळझाडांमध्ये डाळिंब, पेरु, आवळा, लिंबू ही झाडे घ्यावीत.

भारी जमीन : भारी जमिनीत पाणी धरुन ठेवण्याची क्षमता जास्त असते, कारण तिची खोलीसुद्धा ४५ सेंमी पेक्षा खोल असते. त्यामुळे



या जमिनीत ऊस, कापूस, केळी, हळद, तूर ही पिके घ्यावीत. फळझाडांमध्ये आंबा, चिकू, संत्री, मोसंबी घेता येतात. परंतु जमिनीत निचरा नीट होत नसल्यास जास्त पाण्यामुळे पिकांची मुळे कुजण्याचीही शक्यता असते.

पाणथळ किंवा चोपण जमीन : या जमिनीत पाण्याचा निचरा अत्यंत कमी होतो त्यामुळे क्षारताही जास्त असते. त्यामुळे या जमिनीत भात चांगला येतो. याशिवाय निचरा चांगला असेल तर ऊस पीक आणि चारा पीकही चांगले येते.

जमिनीच्या प्रकारानुसार पीक निवड : मातीच्या रचनेनुसार तिचे विविध प्रकार असतात जसे हलकी, मध्यम, भारी, चिकणमाती, वाळू मिश्रित किंवा मुरमाड. अशा विविध प्रकारच्या जमिनींमध्ये अन्नद्रव्यांचे प्रमाणही वेगवेगळे असते. त्यामुळे जमिनीच्या मगदुराप्रमाणे पिकाची निवड केल्यास पिकाला योग्य पोषण मिळते आणि त्याची वाढ उत्तम होते. तसेच जमिनीच्या प्रकारानुसार पिकाची निवड केल्यास अनावश्यक खते आणि अतिरिक्त पाण्याचा वापर टाळता येतो. योग्य पिकांमुळे जमिनीचा कस टिकून राहतो.

मातीच्या प्रकारानुसार जमिनीची खोली ठरते. प्रत्येक पिकाच्या मुळांची रचना वेगळी असते. भारी जमिनीत खोल मुळांची आणि हलक्या जमिनीत कमी खोल मुळांची पिके चांगल्या प्रकारे वाढतात. तसेच मातीच्या प्रकारानुसार तिची पाणी धरून ठेवण्याची क्षमताही बदलते. तसेच प्रत्येक पिकाची पाण्याची आवश्यकता ही वेगवेगळी असते. त्यामुळे पाण्याचा समन्वय साधणारे आपण निवडणे गरजेचे आहे.

जसे हलकी जमीन पाणी जास्त काळ धरून ठेवू शकत नाही, तर काळी किंवा भारी जमीन पाणी जास्त काळ साठवून ठेवते. त्यामुळे कमी पावसाच्या जमिनीत कमी पाण्यावर येणारी पिके आणि जास्त ओल असलेल्या जमिनीत पाणी जास्त लागणारी पिके निवडणे फायदेशीर ठरते. हलक्या उथळ जमिनीत पाणी साठवून ठेवण्याची क्षमता कमी असते, त्यामुळे अशा जमिनीत कमी पाण्यात येणारी पिके निवडायची असतात. खोल जमिनीत भरपूर ओलावा असतो, जिथे मोठी पिके चांगली तग धरतात.

पिंकांची खोली महत्वाची : पिकांच्या प्रकारानुसार त्यांच्या मुळांची खोली ठरते. फळझाडे किंवा खोल मुळे असणाऱ्या पिकांना जमिनीत १ मीटरपेक्षा जास्त खोलीची आवश्यकता असते. जर उथळ जमिनीत ही पिकं लावली, तर त्यांची मुळं खालच्या कठीण दगडाला किंवा मुरमाला आदळतात आणि त्यांची वाढ खुंटते. आणि त्यामुळे झाडांची वाढही थांबते, कधीकधी झाडंही मरतात. अवकाळी पाऊस किंवा दुष्काळ अशा हवामानात जमिनीच्या खोलीनुसार केलेली पिकांची निवड उत्पादनात स्थिरता येते आणि शेतकऱ्यांचे नुकसान टळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७९२ : केंटुकी अमेरिकेचे वे१५ राज्य बनले.
१७९६ : टेनेसी अमेरिकेचे वे१६ राज्य बनले.
१८३१ : सरजेम्स रॉस यांनी पृथ्वीच्या चुंबकीय उत्तर ध्रुवाचे स्थान निश्चित केले.
१८७४ : स्वातंत्र्य पूर्व भारतातील ब्रिटीश सरकारची इस्ट इंडिया कंपनी संपुष्टात आली.
१९२९ : प्रभात फिल्म कंपनीची कोल्हापूर येथे स्थापना.
१९३० : मुंबई व पुणे दरम्यान दख्खनची राणी ही रेल्वेगाडी सुरू झाली.
१९४५ : टाटा मूलभूत संशोधन संस्थेची भारतीय विज्ञान संस्थेच्या परिसरात स्थापना
१९५९ : द. गो. कर्वे पुणे विद्यापीठाचे तिसरे कुलगुरू झाले.
१९६१ : अमेरिकेतील फेडरल कम्युनिकेशन्स कमिशन ला जगात सर्वप्रथम स्टिरीओ एफ. एम. प्रसारणासाठी परवानगी मिळाली.
१९९२ : भारत व इजराईल या दोन देशांतर्गत हवाई मार्गाबाबत करार करण्यात आला.
१९९६ : भारताचे वे११ पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी सूत्रे हाती घेतली.
२००१ : नेपाळचे राजे वीरेंद्र, राणी ऐश्वर्या यांच्यासह अकरा जणांची युवराज दीपेंद्र यांनी निर्घृण हत्या केली.
२००३ : चीन मधील महाप्रचंड थ्री गॉर्जेस धरणात पाणी साठवण्यास सुरुवात झाली.
२००४ : रमेशचंद्र लाहोटी भारताचे वे३५ सरन्यायाधीश यांनी सूत्रे हाती घेतली.
२००७ : साली ब्रिटन देशांत सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास सक्त मनाई करण्यात आली.
२०१४ : नायजेरिया देशांतील फुटबॉल खेळाच्या मैदानात झालेल्या बॉम्बस्फोटा मध्ये ४० लोकांचा मृत्यू झाला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४२ : पहिले भारतीय सनदी अधिकारी सत्येंद्रनाथ टागोर यांचा जन्म. (मृत्यू: ९ जानेवारी १९२३)
१८४३ : फिंगरप्रिंटिंग चे जनक हेन्री फॉल्स यांचा जन्म. (मृत्यू: २४ मार्च १९३०)
१८७२ : मराठी कवी नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ कवी बी यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑगस्ट १९४७)
१९०७ : जेट इंजिन विकसित करणारे फ्रँक व्हाईट यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट १९९६)
१९२६ : अमेरिकन अभिनेत्री मेरिलीन मन्रो यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑगस्ट १९६२)
१९२९ : नर्गिस दत्त, भारतीय अभिनेत्री.
१९३७ : मॉर्गन फ्रीमन, अमेरिकन अभिनेता.
१९३८ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी व लेखक बलदेव वंशी यांचा जन्मदिन.
१९४७ : मॅक्लारेन ग्रुप चे संस्थापक रॉन डेनिस यांचा जन्म.
१९६५ : इंग्लिश बुद्धिबळपटू नायगेल शॉर्ट यांचा जन्म.
१९७० : आर. माधवन, हिंदी चित्रपट अभिनेता.
१९७५ : भारतीय सर्वोच्च क्रीडा सन्मान राजीव गांधी खेळ रत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार तसचं, पद्मश्री पुरस्कार सन्मानित पहिल्या भारतीय ऑलिम्पिक पदक विजेता भारतीय भार्तोलन खेळाडू कर्णम मल्लेश्वरी यांचा जन्मदिन.
१९८५ : भारतीय क्रिकेटपटू दिनेश कार्तिक यांचा जन्म.
१९९१ : भारतीय युवा महिला क्रिकेटपटू राजेश्वरी गायकवाड यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३० : भारतीय धार्मिक नेते स्वामीनारायण यांचे निधन. (जन्म: ३ एप्रिल १७८१)
१८६८ : अमेरिकेचे १५ वे राष्ट्राध्यक्ष जेम्स बुकॅनन यांचे निधन. (जन्म: २३ एप्रिल १७९१)
१८७२ : न्यूयॉर्क हेरॉल्ड चे स्थापक जेम्स गॉर्डन बेनेट यांचे निधन. (जन्म: १ सप्टेंबर १७९५)
१९३४ : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, प्रसिद्ध नाटककार आणि विनोदी लेखक.
१९४४ : आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर यांचे निधन. (जन्म: १८ मार्च १८६७)
१९६० : जर्मन-ऑस्ट्रियन बहीण पॉड हिटलर यांचे निधन. (जन्म: २१ जानेवारी १८९६)
१९६२ : दुसर्या महायुद्धात शेकडो ज्यू लोकांची कत्तल करणार्या ॲडॉल्फ आइकमॅन या जर्मन सेनापतीला इस्त्रायलमधे फाशी देण्यात आले.
१९६८ : अंध मूकबधिर असूनही कला शाखेची पदवी मिळवलेल्या पहिल्या व्यक्ती आणि समाजसेविका हेलन केलर यांचे निधन. (जन्म: २७ जून १८८०)
१९८४ : हिंदी-मराठी चित्रपट अभिनेते नाना पळशीकर यांचे निधन.
१९८७ : दिग्दर्शक, पटकथाकार आणि लेखक के.ए. अब्बास यांचे निधन. (जन्म: ७ जून १९१४)
१९९६ : नीलम संजीव रेड्डी, भारताचे सहावे राष्ट्रपती.
१९९८ : गो. नी. दांडेकर, ज्येष्ठ साहित्यिक.
१९९९ : होव्हर्क्राफ्ट चे निर्माते शोध ख्रिस्तोफर कॉकेरेल यांचे निधन. (जन्म: ४ जून १९१०)
२००० : एकपात्री कलाकार मधुकर महादेव टिल्लू यांचे निधन.
२००१ : नेपाळचे राजे वीरेन्द्र यांची हत्या. (जन्म: २८ डिसेंबर १९४५)
२००२ : दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेट कप्तान हॅन्सी क्रोनिए यांचे विमान अपघातात निधन. (जन्म: २५ सप्टेंबर १९६९)




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत




# काँग्रेसने तरी ओबीसींचे काय कल्याण केले?

## विजय वडेट्टीवारांच्या टीकेला मनोज जरांगेंचे सडेतोड उत्तर

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे शेतात शनिवारी सकाळी भर उन्हात सुरू केलेले बेमुदत उपोषण १५ तासांनंतर सोडले. त्यानंतर सरकारच्या एकंदरीत भूमिकेवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी डबल ढोलकी सरकार म्हणत सडकून टीका केली आहे. तसेच लक्ष्मण हाके यांनी देखील तत्परता नव्हे तर सरकारची लाचारी म्हणत टीका केली होती. यावर आता मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे सध्या गॅलक्सि रुग्णालायत दाखल असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. यावेळी भाजप नेते प्रसाद लाड यांनी त्यांची रुग्णालयात जाऊन भेट घेतली आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, विजय वडेट्टीवार यांचे काँग्रेसचे सरकार असताना



ओबीसींचे कल्याण केले होते का? झोके बांधून दिले होते का? काही बोलतात. ते काय धडाचे होते का? हे पण काही धडाचे नाहीत, यांनी पण मराठा आणि ओबीसी समाजासाठी काही नाही केले. आपल्या जनतेला कळत नाही का? आपण दोघांनी मिळून, ओबीसी आणि मराठा सगळ्यांनी मिळून सरकार विरोधात झुंजले पाहिजे. ते आपल्यात वाद लाऊन देतात आणि आपण सुरू. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील विजय वडेट्टीवार यांनी टीका केली होती. त्यावर विचारले असता मनोज जरांगे पाटील म्हणाले, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री ओबीसी आरक्षणाला धक्का लावतच नाहीत. आमचे जे हक्काचे आहे ते देत आहेत. आमच्या नोंदी सापडल्या आहेत तेच आपल्याला देणार आहेत. त्यांना धक्का लाऊही नका. पण आमच्या नोंदी आमच्या गॅझेटनुसार तर द्यावेच लागेल. मनोज जरांगे पुढे म्हणाले, काँग्रेसने सुद्धा ओबीसीचे वाटोळे केले होते. महायुतीच्या सरकारने सुद्धा तेच केले आहे. मराठा आणि ओबीसीने समजून घेतले पाहिजे की आपण दोघांनी मिळून सरकारच्या विरोधात राहिले पाहिजे. तुम्ही सरकारकडून राहतात आणि आमच्या विरोधात बोंबलतात. दरम्यान, विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी समाजासाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे, त्यावर जरांगे म्हणाले, रस्त्यावर उतरा नाहीतर ओढ्यात उतरा, कुठेही उतरा, असे म्हणत टोला लगावला आहे. उपोषण सुरू असताना मनोज जरांगे यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांना म्हटले होते की माझी नार्को टेस्ट करा आणि अजून एकाची करा, यावर प्रश्न विचारला तेव्हा जरांगे म्हणाले, मला वाटले होते बदल झाला पाहजे. ते परळीचंच म्हणाला होता की माझी नार्को टेस्ट करा. मी नव्हतं काही म्हटले. त्यामुळे तो विषय आता मी पुन्हा हातात घेतो. त्याने कोणाला घातपात करायला लावला होता माझा? त्याला कोण पीए भेटायला जात होता परळीमध्ये, त्यात आरोपी कोण करायला पाहिजे होता, त्या आरोपींना कोण साथ देत आहे, हे सगळे आता मी लावून धरणार आहे, असे म्हणत धनंजय मुंडे यांच्यावर जरांगे यांनी इशारा दिला आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात ३ जूनपर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाचा 'येलो अलर्ट'

## नागरिकांनी दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

अहिल्यानगर। प्रतिनिधी

भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात ३१ मे ते ३ जून या कालावधीत तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता असल्याने जिल्ह्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य नुकसान टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी गिते यांनी केले आहे.

मेघगर्जना होत असताना, विजा चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना नागरिकांनी झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबू नये. सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. तसेच टॉवर्स, ध्वजांचे खांब, विजेचे खांब, धातूचे कुंपण, रोहित्र व लोंबकळणाऱ्या केबल्सपासून दूर राहावे. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा व कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. घराबाहेर मोकळ्या जागेत असताना वीज चमकल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने कान झाकावेत व डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये ठेवून जमिनीशी कमीत कमी संपर्क ठेवावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल तसेच जाहिरात फलक कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी त्यांच्या आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी. वादळी वारा, पाऊस व गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळीच नियोजन करून आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीत विक्रीसाठी आणलेल्या वा नियोजित केलेल्या मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. धरण व नदी क्षेत्रात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घेऊन धरणाच्या पाण्यात, नदीच्या वा कालव्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये व धोकादायक ठिकाणी स्वतःचे छायाचित्र काढू नये. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे पालन करावे. मदतीसाठी नजीकचे पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय येथील ०२४१-२३२३८४४, ०२४१-२३५६९४० या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ११२, १०७७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

# तक्षशिला बुद्धविहारात श्रामणेर शिबिर सुरु

## शिबिरात दहा दिवस केले जाणार मार्गदर्शन



जालना। प्रतिनिधी

शहरातील समर्थ नगरातील तक्षशिला बुद्ध विहारात २९ मेपासून ७ जूनपर्यंत भारतीय बौद्ध महासभेतर्फे भव्य श्रामनेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात एकूण ३० श्रामनेरांनी १० दिवसांसाठी श्रामनेर म्हणून दीक्षा घेतली असून त्यांना धम्माची शिकवण, त्रिशरण पंचशील, बुद्ध-धम्म-संघ संस्कारमय शिकवण दिली जाणार आहे. याठिकाणी थेरो भदंत शिवली हे मार्गदर्शन करत आहेत.

या शिबिरात रवींद्र दारोकार अमरावती, तक्षशिला बुद्ध विहाराचे अध्यक्ष भिकाजी साळवे, अशोक गंगावणे, चंद्रकांत वाघमारे, बगळे, संदीप इंगोले, संभाजी कांबळे, डॉ. रिपब्लिकन सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुशील सूर्यवंशी, डॉ. राजकुमार म्हस्के, संदीप खरात, नगरसेविका रीमाताई खरात यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

यावेळी महिला जिल्हाध्यक्ष आशा कोळी, भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष राजेश सदावर्ते, सरचिटणीस माधवराव पात्रे, कोषाध्यक्ष अरुण वाघमारे, उपाध्यक्ष कुणाल दहिवले आदींसह सर्व उपासक व उपासिका धम्मदानासाठी उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज १४७/२०२६**
**लक्ष्मण व इतर विरुध्द निरंक**
**मार्फत :- ॲड. व्ही. एन. मस्के**

अर्जदार :- १. लक्ष्मण पि. राजाराम शेंबडे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, २. परसराम पि. राजाराम शेंबडे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, अर्जदार क. १ व २ रा. भुरेवाडी, ता. पाटोदा, जि. बीड.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार क. १ व २ यांनी या न्यायालयात मयत राजाराम पि. काशिनाथ शेंबडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी राजाराम पि. काशिनाथ शेंबडे यांचा मृत्यु दिनांक ०८/०९/२०२१ रोजी भुरेवाडी, ता. पाटोदा, जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क. १ व २ हे मयताची मुले आहेत. या अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत राजाराम पि. काशिनाथ शेंबडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३ एप्रील २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १८ जुन २०२६.

स्वाक्षरित
क. लिपीक

आदेशावरुन
स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर,
पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.


# निर्णयक्षमता गमावलेल्या आजच्या तरुण पिढीला भागवत ग्रंथ हाच मोठा आधार

## ज्येष्ठ ब्रह्मचारी रेवतीनंदन दास यांचे निरुपण, श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा उत्साहात

अहिल्यानगर। प्रतिनिधी

आजची तरुण पिढी अनेक बाबतीत संभ्रमात असून आपली निर्णयक्षमता गमावून बसली आहे. अशा भरकटलेल्या युवकांना दिशा दाखवण्यासाठी आणि जीवनात स्थैर्य आणण्यासाठी 'श्रीमद्? भागवत ग्रंथ' हाच खरा मोठा आधार वाटतो, असे निरुपण ज्येष्ठ ब्रह्मचारी श्रीमान रेवतीनंदन दास यांनी केले. येथील नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित श्रीमद्? भागवत कथा निरूपण सोहळ्याचे चतुर्थ पुष्प गुंफताना ते बोलत होते. या सोहळ्यात सर्वश्री वैष्णवतोष्णी दास, डॉ. सतीश फाटके, अशोक कानडे, मदन कांबळे, डॉ. अंजली फाटके, मगन पटेल, राजू पटेल, मदन थोरात यांच्या प्रमुख



उपस्थितीत मोठ्या थाटात आणि पुष्पवृष्टी करत 'श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा' साजरा करण्यात आला.

सोहळ्यादरम्यान इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक श्रीमान गिरीवरधारी दास यांनी अहिल्यानगर शहरासह देशभरात आणि जागतिक पातळीवर सुरू असलेल्या इस्कॉनच्या आंतरराष्ट्रीय कार्याची माहिती उपस्थितांना दिली. अध्यात्म आणि मानवी मूल्यांची जपणूक करण्यासाठी इस्कॉन सातत्याने कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. कथेचे महत्त्व सांगताना श्रीमान रेवतीनंदन दास म्हणाले, अठरा पुराणे ऐकल्यावर जे पुण्य मिळते, ते एकट्या भागवत कथेच्या श्रवणाने प्राप्त होते. कलयुगावर भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केले की: कलीचा वास कुठे? मद्यपान, पशुहत्या-मांसाहार, व्यभिचार आणि जुगार या चार गोष्टींमध्ये कलयुगाचा वास असतो. भांडणे आणि दांभिकता ही कलीची मुख्य लक्षणे आहेत. जो मनुष्य नित्य-निरंतर कथा वाचन, श्रवण, पूजा आणि नामजप करतो, त्यावर कलयुगाचा कोणताही प्रभाव पडत नाही. भगवंताचे नाम आणि भगवंत यात काहीही अंतर नाही. पालकांना मोलाचा सल्ला देताना ते म्हणाले, जे आई-वडील आपल्या मुलांना भगवंताची भक्ती शिकवत नाहीत, ते कर्तव्य विसरतात. आज लेकरांना टीव्हीवर फक्त 'कार्टून' दाखवले तर ती पुढे कार्टूनच बनतील, त्यामुळे त्यांना सुसंस्कारांची गरज आहे. मुलगी साक्षात लक्ष्मी; ४२ पिढ्यांचा उद्धार आपण केलेल्या धर्मकार्याचा लाभ केवळ आपल्यालाच नाही, तर आपल्या पुढील पिढ्यांनाही होतो, असे सांगत त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा दाखला दिला. मुलगा भक्त झाला तर २१ पिढ्यांचा उद्धार करतो, पण मुलगी भक्त झाली तर ती साक्षात लक्ष्मीच्या रूपाने माहेर आणि सासर अशा ४२ पिढ्यांचा उद्धार करते, असे ज्येष्ठ ब्रह्मचारी श्रीमान रेवतीनंदन दास म्हणाले.

# रांगोळीमधून साकारला शनिशिंगणापूरचा नकाशा



सोनई। प्रतिनिधी

महात्मा फुले कृषी विद्यापीठ (राहुरी) संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीचे कृषी महाविद्यालय, सोनई येथील कृषिकन्यांनी एका स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केले होते. ''ग्रामीण जागरूकता कृषी कार्यानुभव व औद्योगिक जोड प्रकल्प २०२६-२७'' अंतर्गत या कृषिकन्यांनी प्रसिद्ध तीर्थक्षेत्र शनिशिंगणापूर गावाचा प्रत्यक्ष आढावा घेतला. यानंतर गावातील बानकर वस्ती येथे हुबेहूब रांगोळीच्या माध्यमातून गावाची संपूर्ण प्रतिकृती नकाशाच्या स्वरूपात साकारून ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

या उपक्रमासाठी कृषिकन्यांनी गावात प्रत्यक्ष फिरून सखोल निरीक्षण केले. चालताना निरीक्षण करणे, शेतकऱ्यांना प्रश्न विचारणे आणि स्थानिकांचे अनुभव ऐकणे या माध्यमातून त्यांनी शनिशिंगणापूरची भौगोलिक, सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी समजून घेतली. या पाहणी दरम्यान गावातील पिकांची सद्यस्थिती, उपलब्ध जलस्रोत, शेतीसमोरील मुख्य समस्या आणि विकासाच्या संधी यांसारख्या विविध मुद्द्यांचा अभ्यास करण्यात आला. कृषिकन्यांनी तयार केलेल्या या रांगोळीच्या नकाशात आणि सादरीकरणात गावाचा वार्षिक पीक तक्ता, उत्पादन तक्ता, मातीचा प्रकार दाखवणारा तक्ता, सामाजिक नकाशा, रस्त्यांचे जाळे, रहदारीचा नकाशा, गावातील जलकुंभ आणि विविध सरकारी कार्यालयांची अचूक ठिकाणे दर्शवण्यात आली होती.

# हिंगोली जिल्ह्याला भूकंपाचा सौम्य धक्का; ३.५ रिश्टर स्केलची नोंद

## जीवित किंवा वित्तहानी नाही, मात्र नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली जिल्ह्यातील काही ठिकाणी रविवारी ता ३१ भूगर्भातून आवाजासह भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला आहे. हिंगोली तालुक्यातील माळधामणी शिवार भूकंपाचे केंद्रबिंदू असून भूकंप मापन केंद्रामध्ये ३.५ रिश्टर स्केल तीव्रतेची नोंद झाली आहे. यामुळे कुठेही जीवित वित्तहानी झाली नसल्याचे जिल्हा प्रशासनाच्या सूत्रांनी सांगितले

हिंगोली जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून भूगर्भातून आवाज येणे तसेच भूकंप जाणवण्याच्या घटना वाढत आहेत. विशेषतः वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे कळमनुरी तालुक्यातील रामेश्वर तांडा या भागात भूकंपाचे केंद्र असल्याचे यापूर्वी स्पष्ट झाले आहे. पांगरा शिंदे, सुकळी, वापटी, कुपटी, राजदरी, सोनवाडी, पिंपळदरी, जलालदाभा, पोतरा, सिंदगी, नांदापूर, बोल्डा, सिरली याभागात भूकंपाची तिव्रता अधिक जाणवत आहे. त्यातच भूगर्भातून आवाज येण्याचे प्रकार या भागातील गावकऱ्यांच्या अंगवळणी पडले आले. दरम्यान आज दुपारच्या सुमारास पुन्हा एकदा भूकंपाचा धक्का जाणवला आहे. भूकंपाचे केंद्र बिंदू हिंगोली तालुक्यातील माळधामणी शिवार आहे. या भूकंपाची ३.५ रिस्टर्स स्केल नोंद झाली आहे. यामुळे कुठेही जीवित वित्तहानी झाली नाही मात्र नागरिकांमधून भीतीचे वातावरण कायम आहे.''हिंगोली जिल्ह्यातील काही ठिकाणी भूगर्भातून आवाजासह भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला असून, या घटनेची नोंद भूकंप मापन केंद्रामध्ये ३.५ रिश्टर स्केल तीव्रतेची झाल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. जिल्हा प्रशासनामार्फत परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे'', असे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी म्हटले आहे. ''प्राथमिक अहवालानुसार जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची जीवित अथवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी. तसेच कोणतीही आपत्कालीन माहिती प्राप्त झाल्यास स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा'', असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

**नागरिकांमधून भूकंप बाबतची धास्ती कायम**

दरम्यान हिंगोली जिल्ह्यांमध्ये वारंवार होणाऱ्या भूकंपाची कारणे शोधण्याची प्रयत्न स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भूकंप शास्त्र विभागाने चालवले आहेत. त्यासाठी ठिकाणी भूकंपमापक यंत्र बसविण्यात आले असून त्यावरील नोंदीची तपासणी घेतली जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. मात्र अद्यापही याबाबतची ठोस कारणे पुढे आली नाहीत. त्यामुळे नागरिकांमधून भूकंप बाबतची धास्ती कायम आहे

# एकसमान पावले टाकत १७३ प्रशिक्षणार्थींची दीड तास परेड

## नवप्रविष्ट प्रशिक्षणार्थींचा दीक्षांत संचलन सोहळा संपन्न

जालना। प्रतिनिधी

जालना राज्य राखीव पोलिस बल (एसआरपीएफ) गट क्र. ०३, जालना येथे महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या (एमएसएफ) नवप्रविष्ट प्रशिक्षणार्थी सत्र ७४ चा दीक्षांत संचलन (पासिंग आऊट परेड) सोहळा उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. प्रशिक्षणाचा यशस्वी टप्पा पूर्ण केल्यानंतर देशसेवेच्या नव्या वाटेवर पाऊल ठेवणाऱ्या प्रशिक्षणार्थींसाठी हा क्षण अविस्मरणीय ठरला. मैदानावर एकसमान पावले टाकत दीड तास चाललेल्या परेड कार्यक्रमात दाद मिळवली. समादेशक संजय बारकुंड यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्यात प्रशिक्षणार्थींनी शिस्तीची झलक दाखवून दिली. उपस्थित मान्यवर आणि पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात या संचलनाला दाद दिली. यावेळी सर्व प्रशिक्षणार्थींनी



देशसेवा, कर्तव्यनिष्ठा आणि प्रामाणिकपणे जबाबदाऱ्या पार पाडण्याची सामूहिक शपथ घेतली.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाजन ग्रुपच्या नूतन देसाई, समृद्धी महामार्गाचे सुरक्षा पर्यवेक्षीय अधिकारी दिलीप जाधव, सहाय्यक समादेशक कैलास पुसाम उपस्थित होते. या प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना कोणत्याही प्रकारची अडचण भासू नये यासाठी प्रशिक्षण अधिकारी बसवेश्वर बिचेवाड, मसुब समन्वय अधिकारी सत्यवान बनसोडे, संबंधित वॉर्डन तसेच एसआरपीएफ गट क्र. ०३ मधील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रशिक्षणार्थींचे पालक व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्यासाठी निवास, भोजन, चहा-नाश्ता आदी सुविधांची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आल्याने उपस्थितांनी प्रशासनाच्या नियोजनाचे कौतुक केले.

सकाळी ७ वाजता सुरू झालेला हा दीक्षांत संचलन सोहळा सकाळी ८.३० वाजता शिस्तबद्ध वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. प्रशिक्षण पूर्ण करून सेवेसाठी सज्ज झालेल्या जवानांच्या या दिमाखदार संचलनाने उपस्थितांच्या मनात देशसेवेचा अभिमान जागवला.उपस्थित मान्यवरांनी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या जवानांचे कौतुक करताना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सोहळ्यात प्रशिक्षणार्थींच्या कुटुंबीयांच्या डोळ्यांत अभिमानाचे अश्रू तर जवानांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास झळकत होता. सोहळ्यानंतर अनेक मान्यवरांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. कठोर प्रशिक्षण, शिस्त आणि कर्तव्यनिष्ठेच्या बळावर जवानांनी यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे सांगत त्यांनी महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या सेवेत उत्कृष्ट कामगिरी करण्याचे आवाहन केले. प्रशिक्षणासाठी घरापासून दूर राहून जवानांनी घेतलेले कष्ट, त्याग आणि चिकाटी यांचा उल्लेख करत त्यांनी समाधान व्यक्त केले. दिक्षांत समारंभप्रसंगी प्रशिक्षणार्थींनी एकसमान पावले टाकत उपस्थितांचे लक्ष वेधले. नातेवाइकांच्या डोळ्यात आले होते अश्रू प्रशिक्षणार्थींचे नातेवाईक या ठिकाणी उपस्थित होते. मुलगा देशसेवेसाठी जातोय, हे पाहून, अनेक नातेवाइकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले होते. या ठिकाणी मिळालेले प्रशिक्षण हे आता देशेसवेसाठी असणार आहे. यामुळे नातेवाइकांनी समादेशक यांच्यासह तेथील अधिकारी, कर्मचाऱ्यांचेही आभार मानले. वेगवेगळ्या जिल्ह्यातील प्रशिणार्थी यांचे नातेवाईक आलेले होते . या परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी झालेली होती.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
सोमवार दि.०१ जून २०२६ | ६

# गोवंश हत्या प्रकरणाचा तातडीने तपास करून दोषींवर कडक कारवाई करा

## ना. पंकजाताई मुंडे यांचे पोलिस अधीक्षकांना निर्देश

बीड । प्रतिनिधी

माजलगांव येथे बकरी ईदच्या दिवशी सुमारे चारशेहून अधिक गोवंशाची निर्दयी आणि अमानुषपणे हत्या करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार अत्यंत संतापजनक असून प्रकरणाचा तातडीने तपास करून दोषींवर कडक कारवाई करावी असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व



पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले आहेत.

सदर घटना समजताच ना. पंकजाताई मुंडे यांनी लगेचच जिल्हा पोलिस अधीक्षकांना संपर्क करून घटनेची माहिती घेतली. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर माजलगांव शहरात मोठ्या प्रमाणावर गोवंशाची कत्तल करण्यात आल्याचे उघड झाले. अतिशय निर्दयी आणि अमानुषपणे हत्या करून गोवंशाचे अवयव मैदानावर फेकण्यात आले, हा प्रकार अत्यंत संतापजनक आहे, याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी या प्रकाराची तातडीने दखल घेतली आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांना फोन करून याचा वेगाने तपास करावा आणि दोषींवर कडक कारवाई करावी असे आदेश दिले. जिल्ह्यात अजून कुठे कुठे असे प्रकार झाले आहेत का? याचाही तपास करून कारवाई करण्यास त्यांनी सांगितले आहे.

# चौसाळा ते वाढवणा रस्त्याचे काम पूर्णत्वाकडे बाबूशेठ लोढाच्या प्रयत्नाला यश

**बीड । प्रतिनिधी**

चौसाळा ते वाळवाणा या रस्त्याच्या मागणीसाठी परिसरातील ग्रामस्थांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे दोन वर्षांपूर्वी मागणी केली होती त्यावेळी माजी मंत्री क्षीरसागर यांनी तातडीने पंतप्रधान योजनेतून हा रस्ता मंजूर करून घेतला आणि त्याचे काम आता प्रत्यक्षात पूर्ण होत असल्याची माहिती प्रेमचंद(बाबूसेठ) लोढा यांनी दिली आहे

चौसाळा ते वाढवणा या रस्त्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित होती या भागातील ग्रामस्थांनी चौसाळा येथील सरपंच बाबुशेठ लोढा यांच्या माध्यमातून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेऊन या रस्त्याचे काम मार्गी लावण्याची मागणी केली होती तेव्हा माजी मंत्री क्षीरसागर यांनी तातडीने पंतप्रधान योजनेच्या अंतर्गत या रस्त्याला मंजुरी मिळून घेतली त्याची टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊन कामही सुरू करण्यात आले आज हे काम जवळपास पूर्ण होत असून पावसाळ्यापूर्वीच या रस्त्याचे काम होणार आहे या भागातील ग्रामस्थांनी देखील माजी मंत्री क्षीरसागर यांना भेटून रस्त्याचे काम सुरू झाल्याची माहिती दिली होती आज हा रस्ता पूर्णत्वाकडे गेल्यामुळे परिसरातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

## माजलगाव तालुक्यातील जद्दी जवळा येथील घटना

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील जद्दी जवळा येथील शेतकरी राजेंद्र आसाराम यादव हे पत्नी रोहिणी यादव सह उसामध्ये मशागतीचे काम करत असताना दि. २७ मे बुधवार रोजी सकाळी त्यांच्यावर अचानक रानडुकराने हल्ला केला.यामध्ये ते गंभीर जखमी झाले आहेत.

माजलगाव तालुक्यातील जद्दी जवळ येथे शेतकरी राजेंद्र यादव हे त्यांच्या गट नं. १६९ मधील शेतात काम करत असताना रानडुकराने अचानक त्यांना जोराची धडक देऊन



खाली पाडले आणि चावा घेण्यास सुरुवात केली.त्यांच्यासोबत असलेल्या त्यांच्या पत्नीने डुकरास हाकलण्याचा प्रयत्न केला,परंतु राजेंद्र यांच्यावर डुकराचा हल्ला सुरूच होता.

यानंतर झालेल्या आरडा-ओरडीनंतर शेतकरी जालिंदर कुरे हे पळत आले. पत्नी रोहिणी यादव यांनी कुर्हाडीने डुकराच्या तोंडावर फटके दिल्यानंतर डुकराने तेथून पळ काढला.या घटनेत राजेंद्र यादव यांच्या दोन्ही पाय,नाक आणि कपाळावर गंभीर जखमा झाल्या आहेत. प्राथमिक उपचार करण्यात आले असून पुढील उपचारासाठी त्यांना बीड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई; एकाच दिवशी ३ ठिकाणी छापे

## १२ लाखांचा गुटखा जप्त!

बीड । प्रतिनिधी

दि.३१.०५.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबवुन तीन विशेष पथके तयार करून त्यांनी पोस्टे बीड शहर, पोस्टे युसूफ वडगाव व पोस्टे सिरसाळा हद्दीतील अवैध गुटखा साठवणुक विक्री व वाहतुक करणा-या इसमाची गोपनिय माहिती काढुन पोस्टे बीड शहर हद्दीतील बसस्थानका समोर एक इसम अवैध गुटखा विक्री करण्यासाठी जवळ बाळगतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन २,२१,०००/- रूपयाचा गुटखा जप्त करण्यात आला. पोस्टे युसूफ वडगाव हद्दीत एक इसम त्यांच्या ताब्यातील स्वीप्ट कारमध्ये



अवैध गुटखा वाहतुक करीत असतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन गुटखा व स्वीट कार असे एकुन ४,५०,०००/- रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोस्टे सिरसाळा हद्दीतील मौजे पोहनेर गावात एक इसम त्याच्या ताब्यातील अँटोरिक्षामध्ये गुटखा भरून त्याची विक्री करण्यासाठी घेवुन जात असतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन ५,४२,८००/- रूपयाचा गुटखा व टेम्पो जप्त करण्यात आला आहे. वरील तिन्ही ठिकाणी १२,१३,८००/- रूपयाचा गुटख्याचा मुद्देमाल व वाहन जप्त करून संबधीत पोस्टेला गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

सदरची कारवाई मा.प्र. पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, मा. अप्पर पोलीस अधीक्षक बीड व मा. पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोउपनि महेश विघ्ने, पोउपनि सुशांत सुतळे, पोह/राहुल शिंदे, पोह/विकास राठोड, पोह/अशोक दुबाले, पोह/अर्जुन यादव, पोह/महेश जोगदंड, पोह/राजु पठाण, पोह/दिलीप गिते, पोह/बप्पा घोडके, पोह/रामचंद्र केकान, पोह/गोविंद भताने, पोअ/सचिन आंधळे, पोअ/मनोज परजणे, पोअ/अश्फाक सय्यद, चापोह/नितीन वडमारे, चापोह/गणेश मराडे, यांनी मिळुन केलेली आहे.

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांची सुरक्षा व्यवस्था काढून आ.प्रकाश सोळंकेंना नेमकं काय साध्य करायचे आहे? - शहाजी सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

आ.प्रकाश सोळंके यांनी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांना शासनाकडून मिळालेल्या पोलीस बंदोबस्ताबाबत तक्रार केली आहे. डॉ.शेटे हे जनसेवेचे व्रत घेऊन महाराष्ट्राच्या विविध भागात रात्री अपरात्री फिरत असतात. मात्र ती सुरक्षा व्यवस्था काढून प्रकाश सोळंकेंना नेमकं काय साध्य करायचे आहे? असा जळजळीत सवाल युवा नेते शहाजी सोळंके यांनी उपस्थित केला आहे.



याबाबत प्रसिद्धीसाठी देण्यात आलेल्या पत्रकात युवा नेते शहाजी सोळंके यांनी म्हटले आहे की,डॉ.ओमप्रकाश शेटे हे प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अर्थात आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष आहेत.या सरकारच्या काळातील पहीला शासन निर्णय झालेला आहे ज्यात त्यांना राज्यस्तरीय समितीचा अध्यक्ष करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना सन्मानित केले आहे. राज्यस्तरीय समितीच्या अध्यक्षांना राज्यमंत्री नंतर मान असतो असा शासन निर्णय आहे. शासनाच्या पोलीस बंदोबस्ताचा आदेश हा पोलीस महासंचालक ( कायदा व सुव्यवस्था) यांच्या परवानगीने देण्यात आलेला आहे.मात्र एवढी वर्षे संविधानिक पदावर असून देखील त्यांना ही बाब माहिती नसावी हे आश्चर्यच म्हणावे लागेल.

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांचा विकासकामे करण्यापेक्षा केवळ तक्रारी करण्यावर जास्त भर असतो. कधी अधिकाऱ्यांची तर कधी गाव खेड्यातील सरपंचाची तक्रार करून त्यांना वेठीस धरणे हा त्यांचा आवडता छंद आहे. सभागृहात जनसामान्यांची बाजू मांडून सरकारला ◀◀ पान ३ वर

# शिवाजीनगर पोलिसांची कामगिरी; घरफोडीचा गुन्हा अवघ्या २ तासांत उघड

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील शाहूनगर भागात बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी झालेल्या घरफोडीचा गुन्हा शिवाजीनगर पोलिसांनी अत्यंत तत्परतेने उघडकीस आणला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या दोन तासांच्या आत पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या असून, चोरीस गेलेला सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे. या धडाकेबाज



कारवाईमुळे पोलिसांचे कौतुक होत आहे.

बांधकामाच्या ठिकाणी झाली होती चोरी

यावाबत मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी सतिराम तुकाराम ढोले (रा. बीड) हे बांधकाम कंत्राटदार आहेत. शाहूनगर भागात त्यांचे एक बांधकाम सुरू आहे. दि. २९ मे २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने बांधकामाच्या साहित्यासाठी असलेल्या बंद खोलीचे कुलूप तोडले. चोरट्याने खोलीत प्रवेश करून आत ठेवलेली लोखंड कापण्याची 'बॉश कंपनीची कट ऑफ मशीन' आणि 'इलेक्ट्रिक मशीन' असा एकूण १६,००० रुपये किमतीचा माल चोरून नेला होता. ◀◀ पान ३ वर

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त ३०१ पणत्यांचे दीपप्रज्वलन

बीड । प्रतिनिधी

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड यांच्या वतीने जयंतीच्या पूर्वसंध्येला भव्य दीपप्रज्वलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच ३०१ पणत्या प्रज्वलित करून त्यांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक सलाम करण्यात आला.



या कार्यक्रमास भाजप नेते डॉ. योगेश क्षीरसागर, नवनाथ अण्णा शिराळे, अजय सवई, नगरसेवक शुभम धूत, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाबूलाल ढोरमारे यांच्यासह समितीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

यावेळी बीड शहरातील विविध समाज बांधवांनी आपल्या कुटुंबियांसह मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. दीपप्रज्वलनाच्या प्रकाशाने परिसर उजळून निघाला असून संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण, भक्तिमय व आनंददायी वातावरणात पार पडला. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी, न्यायप्रिय आणि आदर्श शासन व्यवस्थेच्या कार्याचा गौरव करत उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या दीपोत्सवाने बीड शहरात एक वेगळे प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

# चंदनसावरगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती



**धर्म, न्याय, लोककल्याण आणि आदर्श प्रशासनाचा उत्तुंग वारसा निर्माण करणाऱ्या राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती आज चंदनसावरगाव ग्रामपंचायत कार्यालयात येथे साजरी करण्यात आली यावेळी उपस्थित भाजप तालुका अध्यक्ष भगवान केदार,जिल्हापरिषद सदस्य डॉ योगिणी ताई थोरात ,भाजप वैद्यकीय आघाडी चे अध्यक्ष वासुदेव नेहरकर,भाजप जेष्ठ नेते सुरेंद्र काका तपसे,चंदनसावरगाव चे संरपच जालीदर दळवी,उपसरपंच बालासाहेब तपसे,जगदंब प्रतिष्ठान चे अध्यक्ष शंकर बापू तपसे,ग्रामपंचायत सदस्य उत्तरेश्वर तपसे,दिपक वाघमारे,बालासाहेब गवळी,रामकिसन भंडारे,प्रकाश काळे,गोपाल तपसे आदी सर्व गावकरी मान्यवर उपस्थित होते.**

# सिद्दिकी अब्दुल मुलहिम अब्दुल मुस्तकीम शासकीय सेवेतून निवृत्त

पात्रूड । प्रतिनिधी

पात्रुड येथील रहिवासी पंचायत समिती माजलगाव चे कर्मचारी अब्दुल मोलहीम अब्दुल मुस्तकीन सिद्दिकी उर्फ तमीम मनसबदार हे ३९ वर्ष शासकीय सेवा करून निवृत्त झाले त्यानिमित्ताने पंचायत समिती माजलगाव येथे गटविकास अधिकारी मुळूक मॅडम यांचे अध्यक्ष खाली सेंड ऑफ चा कार्यक्रम पार पडला पंचायत समिती माजलगावचे सर्व कर्मचारी परिसरातील सरपंच ग्रामविकास अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते तसेच मित्र परिवाराच्या वतीने




हॉटेल जय वीरू येथे सेंड ऑफ च कार्यक्रम झाला यावेळी पंचायत समिती चे माजी सभापती जयदत्त नरवळे जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजवळ निळकंठ रावजी भोसले डॉक्टर रुद्रवार पातूरच्या सरपंच लतीफ मोमीन पंचायत समितीचे उपसभापती डॉक्टर वसीम मनबसर पात्रूड चे माजी सरपंच एकनाथराव मस्के एडवोकेट काजिम मांसबदार शिंदेवाडी चे सरपंच पवार माजी सरपंच शिंदे दैनिक लोकतंत्र चे प्रतिनिधि अनिस अंसारी व परिसरातील सरपंच व मान्यवर उपस्थित होते मान्यवरांनी सिद्दिकी साहेबांचे कामाचे कौतुक करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिले.

# नवनाथबाबा मुळे टेकडीची व्याप्ती वाढली-हभप महादेव महाराज चाकरवडीकर

बीड । प्रतिनिधी

देशात महाराष्ट्र महाराष्ट्रात मराठवाडा व मराठवाड्यात बीड या संताच्या भूमी आहेत संत नगद नारायण महाराज, संत बंकट स्वामी महाराज ,संत वामनभाऊ महाराज, संत भगवान बाबा, संत माऊली दादा चाकरवाडी,महादेव मळीचे भगवान बाबा, गोरक्षनाथ टेकडी येथील सदगुरू किसान बाबा महाराज यांच्या बीड हि संताची भूमि आहे त्यात गोरक्षनाथ टेकडी हि नाथांची भूमी आहे गोरक्षनाथ ,किसान बाबा महाराज यांच्या त्यागातून व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या कष्टातून गोरक्षनाथ टेकडीची व्याप्ती वाढली आहे असे तपोनिधी शांतीब्रह्म ह भ प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांनी अधिकमास पौर्णिमेच्या निम्मित हरी कीर्तनात भावना व्यक्त केली



अधिकमास पौर्णिमेच्या निम्मित गोरक्षनाथ टेकडी येथे हरी कीर्तन संपन्न

गोरक्षनाथ टेकडी येथे अधिकमास पौर्णिमेच्या निम्मित तपोनिधी शांतीब्रह्मा ह भ प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांनी संत तुकाराम महाराज यांचा

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।।गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।।२।।नलगे मुक्ती आणि संपदा । संतसंग देई सदा ।।३।।तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।४।।

हा अभंग हरी कीर्तनात घेतला अभंग विवेचनात महादेव महाराज तात्या म्हणाले की परमेश्वराला मागताना हेच मघा की आपल्याला त्या परमेश्वराचा विसर पडू नये व्यवहारीक संपत्ती मागण्या पेक्षा त्या परमेश्वराला माघावे संत तुकाराम महाराज यांना साक्षात भगवंताने विनंती केली की तुम्ही काही तरी मघा तेव्हा तुकाराम महाराज म्हणतात देव आम्हाला मुक्ती किंवा जग ज्याच्या पाठीमागे पळत आहेत अशी संपती देऊ नको फक्त आम्हाला संताची सांगती दे असे अभंग विवेचनात महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांनी अभंग विवेचन करतांनी संत संगतीचे महत्त्व सांगितले आहे संतांच्या सेवेमध्ये संपूर्ण जगाचे सुख मिळत आहे संतांच्या सेवेत मनुष्याच्या जीवनातील सुख निश्चित आहे आनंददायी प्रेमदायी जीवन घडवण्याकरिता ◀◀ पान ३ वर

# वल्लभ कुलकर्णीची धडाकेबाज कामगिरी

माजलगाव । प्रतिनिधी

एच टू ई पॉवर सिस्टिम आणि एल बी एच एम महाराष्ट्र राज्य चॅम्पियनशिप स्पर्धा २०२६ पुणे सात वर्षाखालील मुलांच्या राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धा ३० आणि ३१ मे २०२६ रोजी पुणे येथील सिंहगड इन्स्टिटयूट वाकड येथे संपन्न झाली.या स्पर्धेमध्ये संपूर्ण राज्यभरातून १७८ मुलांनी सहभाग नोंदवला होता या स्पर्धेमध्ये जिल्हास्तरीय निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये लढत होऊन महाराष्ट्र राज्य प्रतिनिधित्व साठी निवड होणार होती या स्पर्धेमध्ये वल्लभ मोगरेकर ने आठ पैकी सहा सामने जिंकून धडाकेबाज कामगिरी केली आहे.



त्याचा पहिला सामना आंतरराष्ट्रीय मनांकन खेळाडू मुंबई सिटी चा इव्हान दुबे सोबत होता संघर्षपूर्ण या सामन्यात तो पराभूत झाला परंतु त्यानंतरच्या सलग तीन सामन्यांमध्ये विविध जिल्हातुन निवड झाल्याले खेळाडू सोबत विजय मिळवून आपले आव्हान कायम ठेवले होते. दुसऱ्या दिवशीच्या पहिला सामना पालघर खेळाडू विरांश बारी सोबतचा सामना गमावल्यानंतर ही नंतरचे सलग तीनही सामने त्याने जिंकले.या स्पर्धेमध्ये एकूण आठ पैकी सहा सामने जिंकणारा सर्वात छोटा म्हणजे साडेपाच वर्षीयखेळडू वल्लभ कुलकर्णी होता एकूण १७८ स्पर्धेकामधून टॉप २० मध्ये त्याने स्थान पटकवले . जून महिना अखेर नागपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय निवड स्पर्धेमध्ये

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26